रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ३४ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in





# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १० जुलै २०२५

किंमत ४ ₹


## हवाई दलाचे विमान कोसळून दोन ठार

**नवी दिल्ली :** राजस्थानमधील चुरु जिल्ह्यातील रतनगड जवळ बुधवारी दुपारी भारतीय हवाई दलाचे जग्वार लढाऊ विमान कोसळले. त्यात दोन्ही पायलटचा मृत्यू झाला, अशी माहिती भारतीय हवाई दलाने दिली आहे. ''हवाई दलाच्या जॅग्वार ट्रेनर विमानाला नियमित सरावादरम्यान बुधवारी राजस्थानमधील चुरूजवळ अपघात झाला. या अपघातात दोन्ही पायलट गंभीररित्या जखमी झाले. यात कोणत्याही नागरी मालमत्तेचे नुकसान झालेले नाही,'' असे हवाई दलाने प्रसिद्ध केलेल्या एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे. हे विमान ज्या ठिकाणी दुर्घटनाग्रस्त झाले तिथे मोठा स्फोट झाल्याचा आवाज ऐकू आला आणि त्यानंतर धुराचे लोट पसरले, अशी माहिती स्थानिकांनी दिली.




# इच्छुकांची स्वप्नं धुळीस

**▶▶ सरपंचपदाची आरक्षण सोडत नव्याने होणार ▶▶ रायगडातील ८१० ग्रामपंचायतींचा समावेश**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यातील ८१० ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण दोन महिन्यांपूर्वी जाहीर करण्यात आले होते. मात्र, ते आरक्षण रद्द करुन नव्याने आरक्षण प्रक्रिया राबविण्यात येणार असून, १५ जुलैपर्यंत आरक्षण नव्याने सुनिश्चित करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यानुसार नव्याने बुधवारी (दि.१५) जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील ग्रामपंचायतींमधील सरपंच पदाची आरक्षण सोडत होणार आहे. त्यामुळे अनेक गावांतील राजकीय समीकरणे बदलणार असल्याने अनेक इच्छुकांच्या आशेवर पाणी फिरणार आहे. एकूणच, नव्याने आरक्षण जाहीर होणार असल्याने गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या भावी सरपंचांची स्वप्नं धुळीस मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.**



जिल्ह्यातीलग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण २०२५ ते २०३० या कालावधीकरिता एप्रिल २०२५ मध्ये जाहीर करण्यात आले होते. कोणती जागा कुणाला सुटली हे स्पष्ट झाल्याने गावगाड्यातील भावी सरपंच कामाला लागले होते. एवढेच नव्हे, तर अनेकांनी जनसंपर्क वाढविला होता. असे असतानाच शासनाकडून नव्याने आरक्षण निर्णय झाला आहे. नवीन आरक्षणामुळे वेगवेगळ्या प्रवर्गातील उमेदवारांनी संधी मिळेल आणि त्यामुळे स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे बदलू शकतात. त्यामुळे या आरक्षणाकडे अनेकांचे लक्ष लागून आहे.

जिल्ह्यातील ग्रामपंचायत संख्या ८१०, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला १६,महिला १७, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला ६२,महिला ६२, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला १०९, महिला ११०, सर्वसाधारण जागा-खुला २१७, महिला २१७ या जागांसाठी आरक्षणांचे सोडत होणार आहे.

अलिबाग तालुक्यातील ६२ ग्रामपंचायतींमधील अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला ०, महिला १, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला ५,महिला ६, नागरिकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा •▶ पान २ वर

### सर्वांच्या नजरा नव्या आरक्षणाकडे

**मागील एप्रिल महिन्यामध्ये सरपंचपदाचे आरक्षण सोडत काढण्यात आली होती. त्यावेळी अनेकांनी या सोडतीवर आक्षेप घेतला होता. काहींनी आनंद व्यक्त केला होता. परंतु, पुन्हा सरपंचपदाची आरक्षण सोडत येत्या १५ जुलै रोजी काढण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी यांनी अधिसूचना जारी केली आहे. या सोडतीमध्ये सर्वांचे लक्ष लागले आहे. नव्याने जाहीर होणारे आरक्षण कोणाच्या पथ्यावर पडणार, कोणाचा पत्ता कट होणार याकडे इच्छुकांचे डोळे लागले आहेत.**

| तालुकानिहाय | ग्रामपंचायती |
|---|---|
| अलिबाग | 62 |
| मुरुड | 24 |
| पनवेल | 71 |
| उरण | 35 |
| कर्जत | 55 |
| खालापूर | 45 |
| रोहा | 64 |
| सुधागड | 33 |
| माणगाव | 74 |
| तळा | 25 |
| महाड | 134 |
| पोलादपूर | 42 |
| श्रीवर्धन | 43 |

# तुकडे बंदी कायदा रद्द

**■ शेतकऱ्यांना मिळाला दिलासा; महसूलमंत्र्यांनी केली घोषणा**

**■ महाविकास आघाडीकडूनही निर्णयाचे स्वागत**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

तुकडेबंदी कायदा रद्द करण्याची मोठी घोषणा महसूल चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. या निर्णयाने राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. बावनकुळेंच्या घोषणेचं महाविकास आघाडीकडून स्वागत केलं आहे. या संदर्भात १५ दिवसात एसओपी केली जाणार आहे.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार १ जानेवारी २०२५ पर्यंत जे तुकडे झाले, तुकडे बंद कायदा असल्याने व्यवहार करता येत नाही. तुकडे बंदी कायदा रद्द केला जाईल. एक एसओपी केली जाईल. महसूल, नगरविकास, जमाबंदी आयुक्त या वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती गठित केली जाईल. ही समिती एसओपी करेल. सुमारे ५० लाख लोकांना फायदा होईल. या संदर्भातील १५ दिवसांत सूचना असतील तर कराव्यात, असेही बावनकुळे यांनी आवाहन केलं आहे.

विजय वडेट्टीवार स्वागत करताना म्हणाले की, हा अतिशय मोठा निर्णय असून, दलालांनी मोठ्या प्रमाणात फसवणूक केली आहे. यामध्ये •▶ पान २ वर



### काय आहे तुकडेबंदी कायदा?

**महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्रात तुकडेबंदी लागू आहे. म्हणजे काय तर तुकडेबंदी कायद्यात नमूद केल्याप्रमाणे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी शेतजमीन विकत घेता येत नाही. महाराष्ट्र सरकारच्या १२ जुलै २०२१ च्या परिपत्रकानुसार, १,२,३ अशी गुंठ्यांमध्ये शेतजमीन खरेदी विक्री करण्याला निर्बंध आले होते. या परिपत्रकाला विरोधही झाला होता. हे प्रकरण न्यायालयतही गेलं होतं. त्यानंतर ५ मे २०२२ राज्य सरकारनं प्रसिद्ध केलेल्या राजपत्रानुसार, राज्यातल्या सगळ्या जिल्ह्यांमध्ये जिरायत जमिनीसाठी २० गुंठे, तर बागायत जमिनीसाठी १० गुंठे एवढं तुकड्याचं प्रमाणभूत क्षेत्र नमूद करण्यात आलं. बऱ्याचशा शेतकऱ्यांना विहिरीसाठी किंवा शेतरस्त्यासाठी किंवा इतर काही कारणास्तव १, २, ३ गुठ्यांमध्ये जमिनी खरेदी किंवा विक्री करावी लागते. त्यामुळे या शेतकऱ्यांसमोर अडचण निर्माण झाली होती. आता याच शेतकऱ्यांसाठी दिलासादायक गोष्ट आहे.**

## कशेडी घाटात मृतदेह फेकणारे तीन आरोपी अटकेत

**पोलादपूर :** तालुक्यातील आंबेनळी आणि कशेडी घाटरस्त्यांलगत मृतदेह टाकून फरार होण्याच्या घटनांना चाप बसेल असे तपासकार्य करून पोलादपूर पोलिसांनी ३० एप्रिल रोजी आढळलेल्या बेवारस अज्ञात व्यक्तीच्या प्रेताबाबत शोध घेताना एका महिलेसह तीन आरोपी गजाआड केल्याची माहिती सहायक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांनी प्रस्तुत प्रतिनिधीस दिली. यामुळे दोन आरोपींचा कर्नाटक सीमावर्ती भागात गेले दोन महिने चाललेला लपाछपीचा आणि पोलिसांना गुंगारा देण्याचा खेळ खल्लास झाल्याचे स्पष्ट झाले आहे. •▶ पान २ वर

# सरकारविरोधात सरकारी कर्मचाऱ्यांचा मोर्चा



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**


जनसुरक्षा विधेयकासह वेगवेगळ्या प्रलंबित मागण्यांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांनी बुधवारी (दि.९) सरकारविरोधात हल्लाबोल केला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चा काढून आपल्या भावना व्यक्त केल्या. या मोर्चाला कर्मचाऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सर्व विभागातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी व शिक्षक तसेच सेवा निवृत्त कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

विविध कामगार-कर्मचारी संघटनांनी देशव्यापी आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी महाराष्ट्रातील कर्मचारी संघटनेने सर्व जिल्ह्यात मोर्चा आयोजित केला. रायगड जिल्ह्यातदेखील मोर्चा काढण्यात आला. •▶ पान २ वर

## लेहमधील दरड दुर्घटनेत
# महाडचे काही पर्यटक अडकले

**। महाड । प्रतिनिधी ।**

लेह-मनाली मार्गावर दरड कोसळल्याने अनेक प्रवासी रस्त्यात अडकले असून, अत्यंत प्रतिकूल हवामानात त्यांची स्थिती अतिशय चिंताजनक बनली आहे. यामध्ये महाड शहरातील अमोल महामुणकर, समीर सावंत व राजेंद्र दरेकर आणि त्यांचे परिवार सदस्य असे एकूण नऊ जण गेल्या दोन दिवसांपासून वाहतूक ठप्प झाल्याने येथील रस्त्यावर प्रचंड कडाक्याच्या थंडीत अडकलेले आहेत.



थंडीचे प्रमाण इतके आहे की, सध्यातापमान २डिग्रीसेल्सियसपर्यंत खाली घसरले आहे. अन्न, पाणी आणि निवाऱ्याचा अभाव असून, अनेक जण उपाशी अवस्थेत आहेत. दरड हटवण्याचे काम सुरू असले तरी सातत्याने नवीन दरडी कोसळत असल्यामुळे मार्ग मोकळा होण्याचा काही निश्चित अंदाज सांगू शकत नसल्याचे अमोल यांनी सांगितले आहे.

प्रशासनाकडून मदत मिळावी तसेच अडकलेल्या प्रवाशांपर्यंत तातडीने अन्न, औषधं आणि गरम कपड्यांची मदत पोहोचवावी, अशी कळकळीची मागणी होत आहे. परंतु, पर्यटकांजवळ स्थानिक महाडच्या नागरिकांनी संपर्क केला असता धीम्या गतीने वाहतूक सुरू झालेली आहे, असे महाडचे अडकलेले पर्यटक यांनी सांगितले आहे. तरी, राज्य सरकारने या गंभीर घटनेची तात्काळ दखल घेऊन आमच्या माणसांना सुखरुप परत आणावे, अशी विनंती लेहमध्ये अडकलेल्या पर्यटकांच्या नातेवाईक आणि घरातील मंडळीनी केली आहे. अद्याप सर्वांच्या घरी चिंतेचे वातावरण आहे.

## गुजरातमध्ये पूल कोसळला
# नऊ जणांचा मृत्यू


**■ अनेक वाहनांचे मोठे नुकसान**

**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

गुजरातमध्ये महिसागर नदीवरील गंभीरा पुलाचा एक भाग बुधवारी (दि. ९) सकाळी कोसळून भीषण अपघात झाला. मुसळधार पावसामुळे हा पूल कोसळल्याचं सांगितलं जात आहे. आणंद आणि वडोदरा यांना जोडणारा गंभीरा पूल कोसळून हा अपघात झाला. पूल कोसळला तेव्हा त्यावरुन वाहनांची ये-जा सुरु होती. त्यामुळे अनेक वाहनं नदीत पडली. या अपघातात आतापर्यंत नऊ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. हा पूल ४५ वर्षे जुना असल्याची माहिती आहे.

महिसागर नदीवरील ४५ वर्षे जुना गंभीरा पूल कोसळल्याने वडोदरा जिल्ह्यात मोठी दुर्घटना घडली, ज्यामुळे संपूर्ण प्रदेशात धक्का बसला.

वडोदरा जिल्ह्यातील पदराला आनंद जिल्ह्याशी जोडणारा हा पूल बराच काळापासून जीर्ण अवस्थेत असल्याची माहिती आहे. पदराचे पोलिस निरीक्षक विजय चरण यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य महामार्गावर सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली आणि त्यात आतापर्यंत नऊ जणांचा मृत्यू झाला. या अपघातात नुकसानग्रसत वाहनांमध्ये दोन ट्रक आणि दोन व्हॅनचा समावेश असल्याची माहिती मिळाली आहे. बचाव पथकांनी आतापर्यंत चार जणांना सुरक्षित बचावलं आहे आणि इतर अपघातग्रस्तांचा शोध सुरू आहे. मुजपूर गावाजवळ ही घटना घडल्याची माहिती आहे. दोन ट्रक, एक बोलेरो जीप, दुसरी एक गाडी पूल ओलांडत असताना अचानक पुलाचा एक भाग कोसळला.



**एमएसआरडीसीचा अजब कारभार | थातुरमातुर डागडुजी जीवावर बेतण्याची शक्यता**

# रस्त्यावरील खड्डे ‘स्लॅग’ने भरण्याचा ‘जावईशोध’

**। चौल । प्रतिनिधी ।**

अलिबाग-रेवदंडा रस्त्याची खड्ड्यांमुळे दयनीय अवस्था झाली आहे; परंतु एमएसआरडीसीकडून खड्डे बुजवताना जेएसडब्ल्यूकडून बाहेर टाकण्यात येणाऱ्या ‘स्लॅग’चा वापर करून डागडुजी केली जात आहे. त्यामुळे रस्त्यावरील खड्डे रेडिमिक्स डांबराच्या सहाय्याने बुजवणे गरजेचे असताना, स्लॅगचा वापर करून खड्डे बुजवण्याचा जावईशोध एमएसआरडीसीने लावला असून, या अजब कारभाराबाबत संताप व्यक्त होत आहे. स्लॅगने खड्डे भरलेल्या रस्त्यावरुन वाहने चालविताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत असून, दुचाकीचा प्रवास धोकादायक झाला आहे.



अलिबाग-रेवदंडा रस्त्यावरील खड्डे वाहनचालकांच्या जीवावर उठले आहेत. त्याची दखल एमएसआरडीसी प्रशासन कशाप्रकारे घेत आहे, याचे जिवंत उदाहरण सध्या पाहावयास मिळत आहे. खड्डे बुजवण्यासाठी जेएसडब्ल्यूकडून बाहेर टाकण्यात येणाऱ्या स्लॅगचा वापर केला जात असल्याने वाहनचालकांमध्ये संताप आहे. पावसानंतर या रस्त्यांची ठिकठिकाणी दुरवस्था झाली आहे. काँक्रिट आणि डांबरीकरणाच्या रस्त्याला गावरस्त्याचे स्वरूप आले आहे. या रस्त्यावर मोजता येणार नाहीत, इतके चार ते पाच फूट लांब व सव्वा फुटापर्यंत खोलीचे खड्डे पडले होते. त्यात •▶ पान २ वर

### सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

**खड्डे तात्काळ योग्य रितीने भरण्यात यावेत. जर याठिकाणी मोठा अपघात झाल्यास त्याला सर्वस्वी एमएसआरडीसीचे अधिकारी, संबंधित ठेकेदार जबाबदार असतील. अपघाताच्या घटना घडल्यास या अधिकारी, ठेकेदारांवर तात्काळ सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी बेलकडेचे ग्रामस्थ रुपेश पाटील यांनी शासनाकडे केली आहे.**

> **“रस्त्यावरील खड्डे तात्काळ सिमेंट काँक्रिटने भरण्यात येतील. वाहनचालकांचा जीव महत्त्वाचा आहे. त्यांना त्रास होणार नाही, याची काळजी आमच्याकडून घेण्यात येईल. – दिलीप हिंगे, कार्यकारी अभियंता, एमएसआरडीसी”**

## आ. गायकवाडांचा कँटिनमध्ये राडा

**मुंबई :** शिळं आणि वास येणारं अन्न दिल्याचा आरोप करत शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कँटीनमधील कर्मचाऱ्याला मारहाण केली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. दरम्यान, या कृतीचा आपल्याला कोणताही पश्चाताप नसल्याचे गायकवाड यांनी म्हणत, जीवाशी खेळाल, मी सोडणार नाही, असा इशाराही दिला. दरम्यान, या घटनेचे पडसाद विधिमंडळ अधिवेशनात उमटले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, संजय गायकवाड यांच्या कृतीबद्दल निषेध व्यक्त केला. मी या प्रकरणाची माहिती घेतली आहे. असे वर्तन •▶ पान २ वर

**अभिनंदन दृष्टि**

## कीर्तीवंत, गुणवंत दृष्टि

प्रीती आणि जयेश सोढा यांची लहान मुलगी दृष्टि सोढा हिने अमेरिकेतील परड्यू युनिव्हर्सिटीमध्ये केमिकल इंजिनिअरिंगच्या विषयामध्ये रिसर्च करिता पी. एच. डी करण्याकरिता ॲडमिशन मिळवले आहे. तरी तिला तिच्या अलिबाग येथील शिक्षक व पालकांना तिच्या शैक्षणिक क्षेत्रातील प्रगतीचा सार्थ अभिमान वाटतो.



Advt.

# हुतात्मा स्मारक बनले दारूचा अड्डा

| महाड | प्रतिनिधी |

महाड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये असणाऱ्या हुतात्मा स्मारकाची मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झाली असून सायंकाळच्या सुमारास दारुड्यांनी हुतात्मा स्मारकाच्या भिंतीचा आधार घेत दारू पिण्यासाठी त्याचा वापर होत असून, सहा आसनी रिक्षा व मोटारसायकल पार्किंगचा अड्डा बनला आहे. मात्र, डोळ्यासमोर हुतात्मा स्मारक असतानादेखील महानगरपालिका प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याने हुतात्मांच्या अवमान करण्याचे काम नगरपालिका प्रशासनाकडून होत असल्याचे दिसत आहे.




महाड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या समोर भारताच्या स्वातंत्र्याकरिता प्राणाहुती देऊन हुतात्मे पत्करले त्यांच्या आणि ज्ञात-अज्ञात हुतात्म्यांच्या स्मृती प्रित्यर्थ स्मारक बांधले आहे.

भारताच्या स्वातंत्र्याकरिता महाडमधून जेव्हा उठाव झाला, त्यावेळेला इंग्रजांनी केलेल्या गोळीबारामध्ये नारायण उर्फ वसंत बाळकृष्ण दाते, कमलाकर विठ्ठल दांडेकर, अर्जुन कानू भोई उर्फ कडू, नथू दौलत टेकवले व बिरवाडी येथील विठ्ठल बिरवाडकर हे बळी पडले. त्यांच्या स्मरणार्थ महाड येथे हुतात्मा स्मारक बांधण्यात आले आहे.

महाड येथील नगरपालिका प्रशासनाच्या इमारतीला लागून असणाऱ्या हुतात्मा स्मारकाला सध्या सहा असानी रिक्षा चालकांच्या पार्किंगचा तसेच कंपन्यांमध्ये कामाला जाणाऱ्या कामगारांच्या मोटारसायकलचा व नगरपालिकेच्या कचरा उचलणाऱ्या हातगाड्यांचा वेढा पडला आहे. त्याचबरोबर अनेक बेवारस व्यक्तीदेखील त्या ठिकाणी झोपण्याचा आसरा घेतात. याचबरोबर मद्य प्राशन करणारे दारुडे यांचा त्या ठिकाणी सायंकाळच्या सुमारास वावर असतो. नगरपालिका मुख्यालयाच्या भिंतीला लागूनच असणाऱ्या हुतात्मा स्मारकाची झालेली दैना अवस्था पाहता नगरपालिका प्रशासन किती जागरूक आहे, हे यावरून स्पष्ट होत आहे.

महाड येथील हुतात्मा स्मारकाच्या मोकळ्या जागेत मोठ्या प्रमाणावर पाण्याचे डबके साठले आहे, तर नगरपालिकेच्या भंगार अवस्थेतील गाड्या या पार्किंग झोनसाठी हुतात्मा स्मारकाच्या जागेतच उभ्या केल्या आहेत. यावरून नगरपालिका प्रशासनाला हुतात्म्यांची किती कळकळ आहे किंवा त्यांच्या पोटी आदर व्यक्त होत आहे हे हुतात्मा स्मारकाच्या सद्यःस्थितीतील घटनेवरून स्पष्ट होत आहे. हुतात्मा स्मारकात असणाऱ्या परिसराला मोठ्या प्रमाणावर दुर्गंधीचे स्वरूप आले असून, नगरपालिका कोणत्याही प्रकारचे स्वच्छता राखत नसल्याने हुतात्मा स्मारक आहे की बेवारस लोकांचा अड्डा असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. याबाबत महानगरपालिकेचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

# लाडक्या बहिणी रमल्या पाककला स्पर्धेत

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यात सध्या खासदार, आमदार यांच्या वाढदिवसानिमित्त काही तरी उपक्रम राबवायचेच या दृष्टीने तालुक्यातील महिला पदाधिकारी कार्यक्रमाचे आयोजन करताना दिसतात. परंतु, उपक्रमात सध्या काहीही वैविधता नसल्याने महिला वर्ग त्याच त्याच कार्यक्रमांना कंटाळला आहे. आयोजकही इतर उपक्रमांना प्राधान्य देत नसल्याने हे उपक्रम कशासाठी हा प्रश्न तालुक्यातील महिलावर्गाला पडला आहे.

श्रीवर्धन तालुक्यात गेल्या काही वर्षांपासून खासदार व आमदार यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांसाठी हळदीकुंकू, श्रावणसरी निमित्ताने मंगळागौर स्पर्धा आणि पाककला स्पर्धांचे आयोजन महिला पदाधिकारी यांच्याकडून करण्यात येते. सौभाग्याच लेणं व विवाहित महिलांच्या दृष्टीने महत्त्वाचा अशा मानल्या जाणाऱ्या हळदीकुंकू या कार्यक्रमाला महिला वर्गाची लक्षणीय उपस्थिती असते. परंतु, श्रावणसरी स्पर्धा व पाककला स्पर्धांचे आयोजन नक्की कशासाठी केलं जातं याचा उलगडा अद्यापही झाला नाही. सदरच्या दोन्ही स्पर्धांमध्ये दरवर्षी तेच संघ व त्याच महिला सहभागी होत असल्याने आता ''लाडक्या बहिणींनी पाककला स्पर्धेतून'' बाहेर पडून तालुक्यातील महिला वर्गासाठी इतर स्पर्धात्मक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करावे, अशी अपेक्षा महिलावर्गाकडून करण्यात येत आहे.

# किल्ले रायगडाचा प्रवेश खड्ड्यांतूनच

**महाड-रायगड मार्गावर नातेखिंडीत रस्त्याची चाळण**

| महाड | प्रतिनिधी |

ऐतिहासिक किल्ले रायगडकडे जाणाऱ्या महाड रायगड मार्गाचा प्रवेशद्वार असलेल्या नातेखिंडीमध्ये खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. मात्र ठेकेदार आणि अधिकारी अपघात होण्याची वाट पाहतात का असा प्रश्न स्थानिक नागरिकांकडून विचारला जात आहे.

ऐतिहासिक रायगड किल्ल्याकडे जाणाऱ्या महाड रायगड मार्गावर नातेखिंड येथे खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहेत. महाड रायगड मार्ग नातेखिंडपासून पुढे सिमेंट काँक्रिटीकरण झाला असला तरी या मार्गाचा प्रवेश मात्र अद्याप खड्ड्यांतूनच होत आहे.



येथील डोंगर अद्याप फोडला न गेल्यामुळे रुंदीकरण रखडलेले आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी जुना डांबरी रस्ता असल्याकारणाने या रस्त्याला गेल्या अनेक वर्षांपासून असलेले खड्डे तसेच कायम आहेत. सध्या हा मार्ग महामार्ग बांधकाम विभागाकडे असून देखील याकडे दुर्लक्ष केले जात आहे. इथून प्रवास करणारे दुचाकी स्वार आणि लहान वाहनांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

किल्ले रायगड मार्गाचे रुंदीकरण काँक्रिटीकरणाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. अनेक ठिकाणी छोट्या मोठ्या पुलांची कामे बाकी आहेत. त्यातलाच एक भाग म्हणून या ठिकाणी असलेला डोंगर फोडून रुंदीकरण होणे अद्याप अपूर्ण आहे. यामुळे याठिकाणी खड्डेच खड्डे तयार झाले आहेत. या खड्ड्यांतून मार्ग काढताना पर्यटक, स्थानिक नागरिक आणि दुचाकी वाहन चालकांना प्रचंड त्रास होत आहे. याबाबतीत यापूर्वी अनेक तक्रारी देखील झाल्या आहेत. मात्र, संबंधित ठेकेदाराची पाठ राखण करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून या खड्ड्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने अधिकारी अपघाताची वाट पाहतात का, असा सवाल नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

**नातेखिंड मोकळा श्वास कधी घेईल?**

नातेखिंड या ठिकाणी असलेल्या महामार्गाच्या उड्डाणपुलाखाली करण्यात आलेली कामेदेखील अनियोजित असल्याने या ठिकाणी फेरीवाल्यांनी कब्जा केला आहे. त्याचप्रमाणे समोरच केलेल्या दुभाजकामुळे देखील अपघात होण्याची शक्यता आहे. या ठिकाणी असलेले अतिक्रमण काढून त्या ठिकाणी सौंदर्यकरण केले जावे अशा प्रकारची मागणीदेखील सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे करण्यात आली होती.

# किनाऱ्यावर 'वाल्मिकी'चा डिझेल स्फोट

**• सरकारी यंत्रणा हाताशी, दररोज लाखोंची तस्करी**

| उरण | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात डिझेल माफियांचा धुमाकूळ सुरू असून, सरकारी यंत्रणांची चक्क लाचखोरीची 'टँकी' भरली जात असल्याने ही तस्करी बिनधास्त सुरू आहे. 'वाल्मिकी' नावाचा डिझेलमाफिया सध्या या काळ्या धंद्याचा बादशाह बनला आहे. दररोज लाखोंच्या डिझेलची अवैध तस्करी होत असली तरी, शासकीय यंत्रणांना याची 'कानोकान' खबर नसल्याचा ढोंगी आव आणला जात आहे, अशी टीका होत आहे.

रायगड जिल्ह्यातील करंजा, रेवस, मोरा, आवरा, बेलापूर आणि हनुमान कोळीवाडा या समुद्रकिनाऱ्यांवरून सर्रास तस्करी सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार डिझेल माफिया वाल्मिकी दर महिना लाखोंचा 'हप्ता' अधिकाऱ्यांच्या घशात घालतोय, त्यामुळे कारवाई फाईलमध्येच गोठते, अशी चर्चा आहे. देशभरात सुरक्षा यंत्रणा 'हाय अलर्ट'वर असताना रायगडचे किनारे मात्र माफियांच्या ताब्यात गेलेत. ही बाब केवळ लाजीरवाणीच नाही, तर थेट देशविघातक आहे.

राजकीय नेत्यांचे कार्यक्रम, जाहीर सभा, 'प्रचंड जनसंपर्क दौरे' यामागचा खर्च उचलणारा वाल्मिकी सध्या अनेक 'मोठ्यांच्या' खिशात बसल्याने, त्याच्यावर कारवाई करण्याची कोणाचीही धमक राहिलेली नाही. उलट, तक्रारी करणाऱ्यांनाच दडपले जाते, असे आरोप स्थानिकांकडून होत आहेत.

डिझेल तस्करीतून कोट्यवधींची मालमत्ता जमवलेल्या या वाल्मिकीवर अजूनही कारवाई नाही, ही लोकशाहीची थट्टा असल्याचे बोलले जात आहे. शासन आणि प्रशासन यांचं हे भोंगळ कारभार उघडकीस आणत रायगडमधील जनतेने आता आवाज उठवायला सुरुवात केली आहे. डिझेल माफियाचा हा गोरखधंदा मोडून काढण्यासाठी ठोस कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

पान १ वरून

## इच्छुकांची स्वप्नं धुळीस

खुला ९, महिला ८, सर्वसाधारण जागा-खुला १७, महिला १६ जागा आहेत.

मुरुड तालुक्यातील २४ ग्रामपंचायतींमधील, अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला ०,महिला १, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला ३, महिला २, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला ३, महिला ४, सर्वसाधारण जागा-खुला ६, महिला ५ जागा आहेत. पेण तालुक्यातील ६४ ग्रामपंचायतीमधील अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला १, महिला ०, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला ७, महिला ७, नागरिकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला ८, महिला ९, सर्वसाधारण जागा-खुला १६, महिला १६ जागा आहेत.

पनवेल तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतीमधील अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला २, महिला १, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला ५, महिला ६, नागरिकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला ९, महिला १०, सर्वसाधारण जागा-खुला २०, महिला १८ जागा आहेत.

उरण तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतींमधील अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला १, महिला ०, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला २, महिला १, नागरिकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला ४, महिला ५, सर्वसाधारण जागा-खुला ११, महिलांसाठी ११ जागा आहेत.

कर्जत तालुक्यातील ५५ ग्रामपंचायतीमधील अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला १, महिला १, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला ८, महिला ८, नागरिकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला ८, महिला ७, सर्वसाधारण जागा-खुला १०, महिलांसाठी १२ जागा आहेत.

खालापूर तालुक्यातील ४५ ग्रामपंचायतीमधील, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला १, महिला १, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला ५, महिला ५, नागरिकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला ६, महिला ६, सर्वसाधारण जागा-खुला ११, महिलांसाठी १० जागा आहेत.

रोहा तालुक्यातील ६४ ग्रामपंचायतीमधील, अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला १, महिला २, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला ५,महिला ५, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला ९, महिला ८, सर्वसाधारण जागा-खुला १७, महिलांसाठी १७ जागा आहेत.

सुधागड तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतीमधील, अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला ०, महिला १, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला ५, महिला ६, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला ४, महिला ५, सर्वसाधारण जागा-खुला ७, महिलांसाठी ५ जागा आहेत.

माणगाव तालुक्यातील ७४ ग्रामपंचायतीमधील, अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला २, महिला २, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला ३, महिला ४, नागरिकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला १०, महिला १०, सर्वसाधारण जागा-खुला २२, महिलांसाठी २१ जागा आहेत.

तळा तालुक्यातील २५ ग्रामपंचायतीमधील, अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला १, महिला १, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला २, महिला २, नागरिकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला ४, महिला ३, सर्वसाधारण जागा-खुला ५, महिलांसाठी ७ जागा आहेत.

महाड तालुक्यातील १३४ ग्रामपंचायतींमधील, अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला ३, महिला ३, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला ५, महिला ४, नागरिकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला १८, महिला १८, सर्वसाधारण जागा-खुला ४१, महिलांसाठी ४२ जागा आहेत.

पोलादपूर तालुक्यातील ग्रामपंचायतीमधील ४२, अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला १, महिला २, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला २, महिला १, नागरिकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला ५, महिला ६, सर्वसाधारण जागा-खुला १३, महिलांसाठी १२ जागा आहेत.

श्रीवर्धन तालुक्यातील ४३ ग्रामपंचायतीमधील, अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला १, महिला ०, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला ३, महिला ३, नागरिकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला ६, महिला ६, सर्वसाधारण जागा-खुला ११, महिलांसाठी १३ जागा आहेत. म्हसळा तालुक्यातील ३९ ग्रामपंचायतीमधील, अनुसूचित जाती आरक्षित जागा खुला १, महिला १, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला २, महिला २, नागरिकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला ६, महिला ५, सर्वसाधारण जागा-खुला १०, महिलांसाठी १२ जागा आहेत.

जिल्ह्यातील अनुसूचित जाती, जमाती, खुला, नागरिकांचा मागासप्रवर्ग, महिला वर्गातील सरपंच पदाचे आरक्षण काढण्यात येणार आहे. बुधवारी (दि. १५) सकाळी अकरा वाजल्यापासून आरक्षण सोडतीला सुरुवात होणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## तुकडे बंदी कायदा रद्द

काही लोकांनी आत्महत्याही केल्या आहेत. मात्र, हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी महसूलमंत्र्यांनी केलेली घोषणा चांगली असल्याचे सांगितले. मी या निर्णयाचे स्वागत करत असून, अनेक महसूलमंत्री झाले, मात्र त्यातील हा चांगला निर्णय घेतला असल्याचे ते म्हणाले.

## आ.गायकवाडांचा कँटिनमध्ये राडा

योग्य नाही. तिथून माहिती आली आहे की भाजीला वास येत होता. पण, त्यासाठी मारहाण करणे योग्य नाही. लोकप्रतिनिधीने मारहाण करणे योग्य नाही. याबद्दल सभागृहातील अध्यक्षांनी योग्य तो निर्णय घ्यावा, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. संजय गायकवाड यांचे वर्तन भूषणावह नाही, यातून सगळ्या आमदारांबद्दल लोकांमध्ये चुकीची भावना जाते, असेही फडणवीस म्हणाले.

## कशेडी घाटात मृतदेह फेकणारे तीन आरोपी अटकेत

पोलादपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३० एप्रिल २०२५ रोजी जुन्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील दरी भागात एका अज्ञात इसमाचे साधारणतः तीन दिवस कुजलेले प्रेत काँक्रिटच्या संरक्षक भिंतीपलीकडे आढळून आले. या घटनेची खबर भोगावच्या पोलीस पाटील शुभांगी राकेश उतेकर यांनी ३० एप्रिल रोजी दिल्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, पोलीस हवालदार आर.के. सर्णेकर, संग्राम बामणे, तुषार सुतार, सौरव जाधव यांनी घटनास्थळी पंचनामा केला. मृतदेह कुजल्याने परिसरात दुर्गंधी पसरली होती. या घटनेनंतर पोलादपूर पोलिसांनी तांत्रिक व मानवी गुप्त माहितीच्या आधारे मृतदेहाची ओळख पटवत तातडीने तपास करताना केवळ चारच दिवसात अक्षय जाधव या तरूणाला तपासाअंती ताब्यात घेतले. अक्षय जाधव याच्याकडून प्राप्त माहितीनुसार, मयत व्यक्तीचे नाव सुनील दादा हसे (वय-५४, रा. अंबड, ता-अकोले, जि. अहिल्यानगर) असे होते.

यावेळी पुढील तपासामध्ये या खुनामध्ये मुख्य दोन आरोपींचा सहभाग उघडकीस आला. सुनील हसे हा वॉक्सवॅगन कार (क्र. एमएच१५ डीएस ८००५) ही भाड्याने देणे आणि स्वत: वाहन चालवून उपजीविका साधणे असा व्यवसाय रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील सती या गावात राहून करीत असे. त्याची वंदना दादासाहेब पुणेकर (वय ३६, रा.लेन, जयसिंगपूर, ता. कोल्हापूर) हिच्यासोबत गाडीने लिफ्ट देण्याच्या निमित्ताने ओळख झाली. वंदना पुणेकर हिला सुनील हसे हा श्रीमंत आणि सधन वाटल्याने तिने त्याला जाळ्यात ओढले. मात्र, त्याच्याकडे फारसे आढळून न आल्याने तिने अक्षय जाधवसोबत त्याला संपविण्याचा घाट घातला. यामुळे तिने तिचा नवरा मोहन पांडुरंग सोनार (वय ५४, रा-बोरसूत, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी) याची मदत घेतली. मोहनच्या मदतीने वंदना पुणेकर हिने सुनील हसे याच्या गाडीमध्ये मागील सीटवर बसून सुनीलला दि.२७ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास कसलेसे गुंगीचे औषध पाजले आणि त्याला कराड चिपळूणमार्गे पोलादपूरच्या दिशेने आणताना गाडीतच ओढणीने मागील सीटवरून गळा आवळून ठार मारले. त्यानंतर त्याचा मृतदेह पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटातील जुन्या महामार्गालगत काँक्रिटच्या संरक्षक कठड्यालगत दरीमध्ये टाकला. यानंतर हे दोघे आरोपी गेल्या दोन महिन्यांपासून फरार होते आणि आपली ओळख लपवत कर्नाटकमधील सीमाभागात लपून राहात होते.

याबाबत रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल आणि रायगड अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्यो मार्गदर्शनखाली आणि महाड उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे यांच्या नेतृत्वाने पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांच्यासमवेत पथकातील पो. हवा. तुषार सुतार, पो.ना. अनुजित शिंदे, महिला पोलीस शिपाई बनसोडे यांनी या दोन्ही प्रमुख आरोपींना महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांच्या सीमावर्ती भागातून आरोपी वंदना दादासाहेब पुणेकर आणि मोहन पांडुरंग सोनार या दोघांना पोलादपूर पोलिसांच्या अथक प्रयत्नांमुळे व मानवी गुप्त माहितीच्या आधारे ताब्यात घेण्यात आले.

पोलादपूर पोलिसांनी अज्ञात मृतदेहाची ओळख पटविण्यापासून खुनाचे धागेदोरे स्पष्ट करण्यापर्यंत तीन आरोपींना ताब्यात घेतल्याने कशेडी आणि आंबेनळी घाटामध्ये गेल्या काही वर्षांपूर्वी सातत्याने प्रेत टाकून पसार होणाऱ्या घटनांना आता पायबंद बसणार असून, या घटनेच्या सखोल आणि यशस्वी तपासाबद्दल पोलादपूर तालुक्यातून पोलीसांचे विशेष अभिनंदन होत आहे.

वंदना दादासाहेब पुणेकर आणि मोहन पांडुरंग सोनार या दोघांविरुध्द पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले आहे.

## सरकारविरोधात सरकारी कर्मचाऱ्यांचा मोर्चा

अलिबागमधील संघटना सदन येथून मोर्चाला सुरुवात करण्यात आली. हा मोर्चा मयूर बेकरी, तहसील कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय असा काढण्यात आला. हिराकोट तलावाजवळ पोहोचल्यावर मोर्चाचे रुपांतर सभेमध्ये झाले. वेगवेगळ्या विभागातील कर्मचाऱ्यांनी आपले मते मांडून सरकारविरोधात नाराजी व्यक्त केली. यानंतर संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. कर्मचारी शिक्षक समन्वय समितीचे अध्यक्ष सुरेश पालकर, कार्याध्यक्ष डॉ. कैलास चौलकर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा आयोजित करण्यात आला.

यावेळी कर्मचारी शिक्षक समन्वय समितीचे जिल्हा अध्यक्ष सुरेश पालकर, कार्याध्यक्ष डॉ. कैलास चौलकर, सरचिटणीस संतोष पवार, निमंत्रक प्रभाकर नाईक, परशुराम म्हात्रे, प्रकाश पाटील, दर्शना पाटील, प्रफुल्ल कानिटकर, रत्नाकर देसाई, दर्शना कांबळे, प्रणाली म्हात्रे, निला देसाई, प्रफुल्ल पाटील, अंकुश शेळके, संजय म्हात्रे, विकास पवार, राजेश थळकर, मंगेश म्हात्रे, गोविंद म्हात्रे, अनिता पाटील, संजय जाधव, निलेश तुरे, रमेश ठाकूर, श्रीकांत पाटील, रमाकांत म्हात्रे, अनिल नागोठकर इत्यादी पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कर्मचारी शिक्षक सहभागी झाले होते. दरम्यान, चार अधिकारी व १५ पोलीस कर्मचारी असा पोलिसांचा बंदोबस्त मोर्चा व सभेच्या वेळी उपस्थित होता. मोर्चाच्या वेळी वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून वाहतूक पोलीसदेखील तैनात करण्यात आले होते.

**या आहेत मागण्या**

सेवानिवृत्त पेन्शन लाभापासून वंचित आहेत. नवीन शैक्षणिक धोरणाचा पुनर्विचार करावा, विनाअनुदानित व सर्वच शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचारी यांना तात्काळ पेन्शन योजनेचा लाभ मिळावा. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावे या मागणीसह चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे प्रश्न चर्चा होऊनसुध्दा सोडविले जात नाहीत, नगर पंचायत, नगर परिषदचा आकृतीबंध तयार करणे. सर्वच विभागांतील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया अत्यंत मंदगतीने सुरु आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणे, कंत्राटीकरण व खासगीकरण धोरण रद्द करून कायमस्वरूपी कर्मचारी भरती करावी. केंद्र सरकारने पीएफआरडीए कायदा रद्द करावा. नवीन चार कामगार कायदे (संहिता) रद्द करण्यात याव्यात. सरकारी उद्योगांचे खासगीकरण रद्द करा.

**बँकेसह टपाल कार्यालयाचा संप**

देशपातळीवर विविध विभागाने संप पुकारला होता. या संपाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बँकांसह टपाल कार्यालय बुधवारी बंद असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. या संपाला जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बँकिंग व्यवहार संपामुळे बंद झाल्याने ग्राहकांना सुविधा उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण झाल्या. कर्मचाऱ्यांसह शिपाई यांनी या संपात सहभाग घेतल्याचा फटका जिल्ह्यातील नागरिकांना बसला.

## रस्त्यावरील खड्डे 'स्लॅग'ने भरण्याचा 'जावईशोध'

काही खड्डे चक्क मोठ-मोठे दगड टाकून हे तात्पुरत्या स्वरूपात भरण्यात आले होते. खड्ड्यांमुळे वाहनचालकांची हाडे खिळखिळी झाली आहेत.

अलिबाग-रेवदंडा हा रस्ता नागाव, मुरुड या पर्यटन स्थळांना जोडणारा एकमेव मार्ग आहे. त्यात अवजड वाहनांचीही वर्दळ या मार्गावरुन मोठ्या प्रमाणात सुरू असते. त्यामुळे या रस्त्याची डागडुजी करावी, अशी मागणी होत आहे. तथापि, रस्त्यांवरील खड्डे चक्क कचरा टाकून बुजवण्यात आल्याचे प्रकारही समोर आले होते. त्यामुळे दुचाकीस्वार व पादचारी घसरून पडत आहेत. मात्र, त्यानंतरही खड्डे बुजवण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येत नसल्याचेच चित्र आहे. अद्यापही बहुतांश रस्त्यांवरील खड्डे कायम असून, या खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी होत आहे. त्याचाही वाहनचालकांना त्रास होत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दररोज कुठल्या ना कुठल्या वाहनाचे छोटे-मोठे अपघात होतच असतात. या प्रकारामुळे वाहनधारकांमध्ये नाराजी पसरली असून, स्लॅगऐवजी खडी व डांबर टाकून खड्डे बुजवण्याची मागणी करण्यात येत आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000036940**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-2/ 2025-2026.**<br>RFx E-tender for Hiring of vehicle at 220kV Uran Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.08.2025 to 31.03.2025.<br>**Tender amount Rs. 3,87,637/-, EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **09.07.2025, 18:00 Hrs. to 20.07.2025, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 20.07.2025 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **21.07.2025 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505
**Note:** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(A. P. JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V.(O&M) DN. PANVEL**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे शहाबाज, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतींच्या मालकी हक्कांची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेल्या मिळकती माझे अशिलांना कायमस्वरूपात विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

| विद्यमान मालकांची नावे | मौजे | भूमापन क्रमांक व व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| संभव कुमार जैन | शहाबाज, ता. अलिबाग जि. रायगड | २५९ | ०-५६-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-५६-०० | ८.११ |
| विजय गिरधारीलाल कोठारी | शहाबाज, ता. अलिबाग जि. रायगड | २५९ | ०-१३-१०<br>पो.ख. ०-०३-५०<br>एकूण क्षेत्र ०-१६-६० | १.९० |
| हिमांशू सुदर्शन जैन व संभव कुमार जैन | शहाबाज, ता. अलिबाग जि. रायगड | १७४ | ०-२९-१०<br>पो.ख. ०-०२-००<br>एकूण क्षेत्र ०-३१-१० | ४.२५ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे गृहीत धरून माझे अशिल वरील मिळकतींच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख : १०/०७/२०२५

सही/-
**ॲड. रिया गणेश पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड
रा.मु. नेहुली, पो. खंडाळे
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९६०७३३१९७५

# संप हे पहिले पाऊल

कामगार कायद्यांच्या विरोधातील देशव्यापी संपाला बुधवारी चांगला प्रतिसाद मिळाला. यामध्ये बँका, पोस्ट, रेल्वे, वीज असे सरकारी क्षेत्रातील पांढरपेशेही सामील झाले होते. याखेरीज कोळसा खाणी, कारखाने यामधील लाखो कामगारही संपात उतरले होते. कामगार संघटना व डावे पक्ष यांचा जोर बऱ्याच राज्यांमध्ये कमी झाला आहे. शिवाय मोदी सरकार विरोधकांना दडपण्यासाठी कोणत्याही थराला जाते हे वेळोवेळी दिसले आहे. आंदोलक शेतकऱ्यांना रोखण्यासाठी रस्त्यावर खिळे ठोकण्यात आले व तारांची कुंपणे लावण्यात आली होती. त्यामुळे अशा संपांमध्ये उतरण्याबाबत लोक थोडे साशंक असतात. मात्र त्यांच्या प्रश्नांची धगच इतकी आहे की बुधवारचा लाक्षणिक संप पूर्णपणे यशस्वी झाला. मोदी सरकार सारखे विकास, विकास असे बोंबलत असते. पैसा ओतला की आपोआप विकास होतो असे सरकारला वाटते व लोकांचाही तसाच समज करून देण्यात आला आहे. पण रस्ते असोत की कारखान्यात तयार होणारे मोबाईल वा साबण, हे कामगारांच्या कष्टातूनच तयार होतात. त्याचा मोबदला त्यांना पुरेसा मिळतोच असे नाही. शिवाय सध्याच्या काळात नोकरी जाण्याची टांगती तलवार कायम डोक्यावर असते. सरकारने खरे तर या कामगारांचे रक्षण करणे अपेक्षित असते. पण जे मोदी सरकार देशातील तमाम बंदरे, विमानतळ, वीज प्रकल्प निर्लज्जपणे अदानीच्या घशात घालत आहे त्याच्याकडून गरिबांच्या वा कामगारांच्या रक्षणाची अपेक्षा व्यर्थ आहे. उलट कामगारांना सर्व बाजूंनी दडपता कसे येईल याचाच विचार चालू आहे. ब्रिटिशांचे सरकार परके होते. तरीही त्याने इथल्या कामगारांसाठी काही कायदे करण्याचे प्रयत्न केले. नारायण मेघाजी लोखंडे या सत्यशोधकी कामगारनेत्यामुळे मुंबईत रविवार ही साप्ताहिक सुट्टी मंजूर झाली. अतिशय लहान मुलांना कामावर ठेवायला बंदी झाली. स्वातंत्र्यानंतर कामगारांना संघटना करण्याचा तसेच संप करण्याचा अधिकार घटनेद्वारा मिळाला. त्यासाठी विविध कायदे अस्तित्वात आले. कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी लवाद असावेत, कंत्राटी कामगारांच्या नावाखाली पिळवणूक होऊ नये अशा तरतुदी त्यात करण्यात आल्या. सरकारचे निरीक्षक त्यावर लक्ष ठेवतील अशी व्यवस्था झाली. पण मोदी सरकार ही सर्व व्यवस्था मोडीत काढू पाहत आहे.

## मालक मोकाट

या सरकारने कामगारविषयक आजवर अस्तित्वात असलेले २९ विविध कायदे एकूण चार कायद्यांमध्ये गुंडाळण्याचे ठरवले आहे. त्याला कामगार संहिता असे हिंदुत्ववादी नाव देण्यात आले आहे. मात्र त्यातून कामगारांचे हित जपण्याऐवजी मालकांच्या स्वार्थाचीच काळजी घेतली गेली आहे. नव्या संहितेनुसार तीनशेहून कमी कामगार असतील अशा कारखाने वा कंपन्यांमधून कामगारांना काढण्यासाठी सरकारची परवानगी गरजेची नाही असे निर्धारित करण्यात आले आहे. शिवाय कोणत्याही क्षणी मालक टाळेबंदी लागू करू शकतो. या देशात तीनशेहून अधिक कामगार काम करतात असे कारखाने वा खाणी, कंपन्या इत्यादींची संख्या खूपच कमी आहे. त्यामुळे या एका फटक्यात सुमारे ७५ ते ८० टक्के कामगारांना आजवर जे कायद्याचे संरक्षण मिळत होते ते बाद होणार आहे. ते उघड्यावर पडणार असून निव्वळ मालकाच्या मर्जीवर अवलंबून राहणार आहेत. पूर्वी अशा कारखान्यांमधील कामगारांचा पगार, पगारवाढ, महागाईभत्ता, त्यांना कायम करणे इत्यादी गोष्टींना नियम लागू होते. आता सगळे बंद होतील. कामगारांना संघटना बांधण्यावरही बरेच निर्बंध आले आहेत. संपासाठी नोटीस देणे बंधनकारक करण्यात आले आहे. शिवाय प्रकरण लवादाकडे असेल किंवा लवादाचा निर्णय आला असेल तर पुढचे दोन महिने संप करण्यावर बंदी राहणार आहे. संप बेकायदा ठरवता यावेत अशा रीतीने नियम करण्यात आले आहेत. असे संप बेकायदा ठरले तर त्याच्या नेत्यांना भयंकर दंड किंवा तुरुंगवास होऊ शकणार आहे. सर्वात भयंकर हाल कंत्राटी कामगारांचे होणार आहेत. आज अगदी थोड्या कंपन्या वगळता बहुतेक सर्वत्र कंत्राटी पध्दत रुढ झाली आहे. मात्र तरीही कंत्राटी कामगारांनाही जे थोडेफार संरक्षण होते तेही उडवण्यात आले आहे. आता ५० हून कमी कामगार नेमणाऱ्या कंत्राटदाराला कोणताही परवाना घेण्याची गरज नाही. पूर्वी केवळ हंगामी स्वरुपाच्या कामावरच कंत्राटी कामगार घेण्याची परवानगी होती. आता हे बंधन काढून टाकण्यात आल्याने बडे मोटार वा वाहन कारखाने किंवा इंजिनिअरिंग फर्म्स इत्यादींमध्येही सरसकट कंत्राटी कामगारांच्या नियुक्त्या होणार आहेत.


## कामगारांची कोंडी

पूर्वी सरकारी यंत्रणा थोड्याफार का होईना कामगारांच्या बाजूने उभ्या राहत. पण आता त्यांचे अधिकार कमी करून टाकण्यात आले आहेत. कामगार संघटनेच्या तक्रारीवरून आता कोणतीही तपासणी केली जाणार नाही. नव्या कायद्यात असंघटित कामगारांसाठीही कोणतीही सुरक्षा पुरवण्यात आलेली नाही. भविष्य निर्वाह निधीचे योगदान बारावरून दहा टक्क्यांवर आणले आहे. शिवाय मालकाच्या मर्जीनुसार ते आणखी कमीही केले जाऊ शकते. मालक व कामगारांना वाटेल तेव्हा भविष्य निर्वाह निधीतून बाहेर पडण्याची मुभा दिली आहे. आता त्यावर बंधने असल्याने किमान काही रक्कम त्यांच्या गाठीला असे. आता हे संरक्षण वाऱ्यावर सोडून दिले गेले आहे. पूर्वी भविष्य निर्वाह निधीची रक्कम मालकाने न भरल्यास त्याला तुरुंगात टाकण्याची तरतूद होती. आता ती गेली आहे. कामगारांनी एक दिवसाचा संप केला तर त्याचा आठ दिवसांचा पगार कापण्याचा अधिकारही दिला गेला आहे. एकूण या सर्वच तरतुदी निव्वळ मालकांचे हित पाहणाऱ्या व कामगारांची कोंडी करणाऱ्या आहेत. त्यांच्या विरोधात कामगारांना संप करावा लागावा हे एरवी कोणत्याही सरकारसाठी लांच्छनास्पद ठरले असते. पण मोदी सरकार हे उघडपणे अदानी, अंबानी व अशाच पैसेवाल्यांच्या बाजूने उभे आहे. त्यामुळे याची लाज वाटायला हवी हे त्याच्या गावी असण्याचे कारण नाही. मुळात या देशातील संघटित कामगारांची संख्या केवळ पाच-दहा टक्के आहे. बहुसंख्य नव्वद टक्के कामगार, मजूर यांना कोणत्याच कायद्याचे कसलेही संरक्षण नाही. त्यांनी काम केले तरच त्यांचे पोट भरेल अशी व्यवस्था आहे. त्यामुळे त्यांचे आजारपण, मृत्यू किंवा कुटुंबाचे शिक्षण यासाठी काहीही तरतूद नाही. भांडवलशाहीची मक्का म्हणवल्या जाणाऱ्या अमेरिकेतही अशी शोषक व्यवस्था नाही. तिथेही कामगारांना कामावर ठेवण्याबाबत व तासाला किमान पगार देण्याबाबत कडक नियम आहेत. पण मोदी सरकारला हे सर्व काढूनच टाकायचे आहे. बँका, विमा कंपन्या इत्यादींमधील पांढरपेशांची अवस्थाही काही वर्षांनी अशीच होणार आहे. याच्या विरोधात सर्वच कामगारांना सातत्याने लढावे लागणार आहे. बुधवारचा संप ही त्याची पहिली पायरी होती. पण इथून पुढे संघर्षाची धार आणखी तीव्र करावी लागणार आहे.

विचार

# परिस्थिती प्रतिकूल, अर्थव्यवस्थेला अनुकूल

***गेला काही काळ युध्दजन्य परिस्थिती, लष्करी संघर्ष आणि थांबवली गेलेली युध्दे यामुळे गाजत राहिला असला तरी शेअर बाजारांच्या बरकतीच्या युद्धात भारताने चीन, अमेरिकेवर मात केलेली पहायला मिळाली. एकंदरीत, प्रतिकूल परिस्थितीमध्येही भारतीय अर्थव्यवस्थेची कामगिरी उत्तम राहिली. दरम्यान, इराणच्या भूमिकेमुळे कच्च्या तेलाच्या दरात पुन्हा वाढ होऊ घातली आहे. त्याकडे मात्र लक्ष ठेवावे लागणार आहे.***




गेला काही काळ युध्दजन्य परिस्थिती, लष्करी संघर्ष आणि थांबवली गेलेली युध्दे यामुळे गाजत राहिला असला तरी जगभर अर्थव्यवस्थेवर परिणाम जाणवला. सुदैवाची बाब म्हणजे भारतावर या वातावरणाचा आर्थिक परिणाम पहायला मिळाला नसून शेअर बाजारांच्या बरकतीच्या युद्धात भारताची चीन, अमेरिकेवर मात पहायला मिळाली. एकंदरीत, प्रतिकूल परिस्थितीतही भारतीय अर्थव्यवस्थेची कामगिरी उत्तम राहिली. दरम्यान, इराणच्या भूमिकेमुळे कच्च्या तेलाच्या दरात पुन्हा वाढ होऊ घातली आहे. त्याकडे मात्र लक्ष ठेवावे लागणार आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून चर्चीत युध्दांपलिकडे तीन देशांमध्ये आणखी एक युद्ध सुरू होते. वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये भारताने हे युद्ध जिंकले आहे. विशेष म्हणजे या युद्धात भारताने जगातील दोन मोठ्या अर्थव्यवस्थांना, अर्थात अमेरिका आणि चीनला खूप वाईट पद्धतीने पराभूत केले आहे. गेल्या सहा महिन्यांपासून भारत, अमेरिका आणि चीनमध्ये एक युद्ध चालू होते. या युद्धाचे कुरुक्षेत्र शेअर बाजार हे होते. त्यात भारताने विजय मिळवला आहे. वर्षाच्या पहिल्या सहामाहीमध्ये भारताच्या शेअर बाजाराने अमेरिका आणि चीनच्या शेअर बाजारांना हरवले आहे. एकीकडे भारताच्या शेअर बाजारामध्ये सुमारे सात टक्के वाढ झाली आहे. दुसरीकडे, अमेरिका आणि चीनच्या शेअर बाजारात फक्त तीन ते पाच टक्के वाढ झाली आहे. याचा अर्थ असा की, भारताने आपल्या शेअर बाजारातील गुंतवणूकदारांना अमेरिकन आणि चीनी बाजारांपेक्षा जास्त परतावा दिला आहे. तेही अशा वेळी जेव्हा युक्रेन-रशिया युद्ध, ट्रम्प टॅरिफ, अमेरिका-चीन टॅरिफ वॉर, पाकिस्तानविरुद्ध भारताचे 'ऑपरेशन सिंदूर' आणि इराण आणि इस्रायलमधील युद्ध सुरू होते. गेल्या सहा महिन्यांमध्ये म्हणजेच चालू वर्षात आतापर्यंत मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकाने गुंतवणूकदारांना सुमारे सात टक्के परतावा दिला आहे. याचा अर्थ त्यात ५,३७१.१९ अंकांची वाढ झाली आहे. महिन्याच्या शेवटच्या ट्रेडिंग दिवशी निर्देशांकामध्ये सुमारे ४०० अंकांची घसरण दिसून येत असून तो ८३,६८३.४३ अंकांवर व्यवहार करत आहे. दुसरीकडे, राष्ट्रीय शेअर बाजाराच्या प्रमुख निर्देशांक 'निफ्टी ५०'मध्ये चालू वर्षात सुमारे आठ टक्क्यांची वाढ दिसून आली आहे. याचा अर्थ निफ्टीमध्ये १,८४९.५५ अंकांची वाढ दिसून आली.

**महेश देशपांडे**

दुसरीकडे अमेरिका आणि चीनी बाजारांनी भारताच्या तुलनेत गुंतवणूकदारांना जास्त परतावा दिलेला नाही. अमेरिकन बाजार निर्देशांकाने चालू वर्षात ३.३७ टक्के म्हणजेच १,४२७ अंकांची वाढ नोंदवली, तर नॅसडॅक कंपोझिटमध्ये ५.१५ टक्के म्हणजेच ९९२.६७ अंकांनी वाढ झाली आहे. एस अँड पी ५०० मध्येही वाढ दिसून आली आहे; परंतु ती तितकी जास्त नाही. आकडेवारी तपासल्यास एस अँड पी ५०० ने गुंतवणूकदारांना ५.१९ टक्के म्हणजेच ३०४.५२ अंकांची वाढ दिली आहे. दुसरीकडे, चीनच्या एसएसई कंपोझिट या मुख्य एक्सचेंजमध्ये चालू वर्षात ५.६३ टक्के म्हणजेच १८३.८० अंकांनी वाढ दिसून आली आहे. जपानच्या निक्केईमध्ये फक्त तीन टक्के वाढ दिसून आली आहे. विशेष म्हणजे गेल्या तीन महिन्यांमध्ये म्हणजेच एप्रिल ते जून या काळात शेअर बाजारात दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे परदेशी गुंतवणूकदारांनी भारतात केलेली गुंतवणूक. जानेवारी ते मार्च या काळात परदेशी गुंतवणूकदारांनी शेअर बाजारातून १,१६,५७४ कोटी रुपये काढले होते. त्यामुळे मोठी घसरण दिसून आली. दुसरीकडे, एप्रिल ते जून या काळात एफआयआयनी शेअर बाजारात ३२,९९८ कोटी रुपये गुंतवले आहेत. त्याचा परिणाम शेअर बाजारात वाढीच्या स्वरूपात दिसून आला आहे. तसे, एकूणच पाहिल्यास, चालू वर्षात गुंतवणूकदारांनी शेअर बाजारातून ८३,५७६ कोटी रुपये काढले आहेत.

याच सुमारास अर्थ मंत्रालयाच्या बैठकीत म्हटले आहे की, २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला भू-राजकीय तणाव असूनही भारताच्या अर्थव्यवस्थेने मजबूत आणि लवचिक कामगिरी केली. देशाची आर्थिक परिस्थिती स्थिर आणि सकारात्मक आहे. आंतरराष्ट्रीय अस्थिरतेच्या वातावरणातही भारताच्या अर्थव्यवस्थेने ताकद दाखवली आहे. तिला सुधारित देशांतर्गत मागणी, महागाईत घट, स्थिर रोजगार आणि निर्यात क्षेत्राच्या बळकटीने पाठिंबा दिला आहे. अहवालात पुढे म्हटले आहे की, ई-वे बिल, इंधन वापर आणि पीएमआय निर्देशांक यासारखे उच्च-फ्रिक्वेन्सी निर्देशक पुष्टी करतात की आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या सुरुवातीलाही आर्थिक क्रियाकलाप स्थिर राहिले आहेत. रब्बी पिकांचे चांगले पीक आणि सकारात्मक मॉन्सूनच्या अंदाजामुळे ग्रामीण भागात मागणीत वाढ झाली आहे. वाढत्या पर्यटन आणि व्यावसायिक प्रवासामुळे शहरी वापराला चालना मिळत आहे, जे हवाई प्रवास आणि हॉटेल बुकिंगमध्ये वाढ झाल्यामुळे दिसून आले आहे. तथापि, अहवालात म्हटले आहे की बांधकाम साहित्य आणि वाहनविक्रीसारख्या काही क्षेत्रांमध्ये मंदीची चिन्हे दिसून आली आहेत. मे २०२५ मध्ये अन्न आणि किरकोळ महागाईमध्ये सतत आणि व्यापक घट नोंदवली गेली. याला मजबूत कृषी उत्पादन आणि सरकारी हस्तक्षेप कारणीभूत होता.

जागतिक घडामोडींमुळे २०२५ च्या सुरुवातीला व्यापार तणाव वाढला. त्यामुळे वित्तीय बाजारपेठांमध्ये अस्थिरता निर्माण झाली. तथापि, दुसऱ्या तिमाहीमध्ये परिस्थिती काही प्रमाणात सामान्य झाली. मे महिन्यात भारतीय सरकारी बाँड बाजाराने स्थिरता आणि आत्मविश्वास राखला. याचे मुख्य कारण भारतीय रिझर्व्ह बँकेने विक्रमी लाभांशाची घोषणा आणि आर्थिक वर्ष २०२५ च्या शेवटच्या तिमाहीमध्ये मजबूत वाढ होती. यामुळे सरकारी बाँडवरील जोखीम प्रीमियम १८२ बेसिस पॉइंट्सपर्यंत खाली आला. भारताच्या एकूण निर्यातीमध्ये (वस्तू आणि सेवा) मे २०२५ मध्ये वार्षिक २.८ टक्के वाढ नोंदवली गेली, जी जागतिक आर्थिक मंदी आणि टॅरिफ अस्थिरता असूनही निर्यात क्षेत्राची ताकद दर्शवते. १३ जूनपर्यंत देशाचा परकीय चलन साठा ६९९ अब्ज डॉलर राहिला. इतर जागतिक चलनांच्या तुलनेत भारतीय रुपया मध्यम अस्थिरतेसह स्थिर राहिला. अहवालात म्हटले आहे, की कामगार बाजारदेखील स्थिरतेकडे वाटचाल करत आहे. एआय/एमएल, विमा, रिअल इस्टेट, बीपीओ/आयटीईएस आणि हॉस्पिटॅलिटी यासारख्या क्षेत्रांमध्ये 'व्हाईट-कॉलर' नोकऱ्यांमध्ये तेजी दिसून आली. 'पीएमआय'च्या रोजगार उप-निर्देशांकात जलद वाढ दिसून आली, जी मजबूत रोजगारनिर्मिती दर्शवते. याव्यतिरिक्त, 'ईपीएफओ' डेटा औपचारिक रोजगारात सतत सुधारणा दर्शवतो.

दरम्यान, इराण आणि इस्रायलमध्ये युद्धबंदी झाली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीनंतर १२ दिवसांचे युद्ध थांबले. तथापि, इराणला याबद्दल अद्याप खात्री नाही. इराणला पुन्हा युद्ध सुरू होण्याचा धोका वाटत आहे. इराणने म्हटले आहे की इस्रायलसोबतची युद्धबंदी टिकेल की नाही याबद्दल त्यांना शंका आहे. दुसरीकडे, कोणत्याही नवीन हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यास हा देश तयार आहे. मध्यपूर्वेतील देशांमध्ये पुन्हा सुरू होणाऱ्या युद्धाच्या कुजबुजीचा परिणाम कच्च्या तेलावर म्हणजेच काळ्या सोन्यावर दिसून येत आहे. कच्च्या तेलाच्या किमती पुन्हा वाढत आहेत. इराणच्या अर्ध-सरकारी 'फार्स' या वृत्तसंस्थेने सशस्त्र दल प्रमुख अब्दुल रहीम मौसावी यांच्या विधानांच्या आधारे दावा केला आहे की युद्धबंदी आणि त्याच्या आश्वासनांना चिकटून राहण्याच्या शत्रूच्या हेतूबद्दल इराणच्या मनात गंभीर शंका आहेत. पुन्हा हल्ला झाला तर इराण जोरदार प्रत्युत्तर देण्यास तयार आहे. 'ब्लूमबर्ग'च्या मते मौसावी यांनी अलिकडेच सौदी संरक्षण मंत्री खालिद बिन सलमान यांच्याशी फोनवर चर्चा केली. त्यात इराण आणि इस्रायलने २४ जून रोजी युद्धबंदीची पुष्टी केली. त्यामुळे सुमारे दोन आठवड्यांपासून सुरू असलेल्या लष्करी कारवाया संपल्या. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल'वर युद्धबंदीची घोषणा केल्यानंतर काही तासांमध्येच ही घोषणा केली. १३ जून रोजी इस्रायली हल्ल्याने इराण-इस्रायल तणाव सुरू झाला. त्यात अनेक वरिष्ठ इराणी लष्करी अधिकारी आणि शास्त्रज्ञ मारले गेले. इस्रायली हल्ल्यात ज्येष्ठ लष्करी नेते मोहम्मद बघेरीदेखील मारले गेले. यदाकदाचित इराण आणि इस्रायलमध्ये पुन्हा युद्ध झाले आणि इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतला तर संपूर्ण जगाच्या तेलाच्या किमतींवर परिणाम दिसून येईल. जागतिक तणावामुळे ब्रेंट क्रूड तेलाच्या किमती वाढू शकतात.

चर्चा आजची

# रुग्णांची सुरक्षा 'स्लॅब' भरोशे

अलिबाग तालुक्यातील जिल्हा रूग्णालय हे रायगड जिल्ह्यातील सर्वसामान्यांना परवडणारे असे रूग्णालय आहे. या ठिकाणी जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून रूग्ण उपचारासाठी येत असतात. त्यांना विश्वास असतो की, आपण या ठिकाणी आल्यास १०० टक्के बरे होऊनच घरी परतू. मात्र, काही वर्षांसून या रूग्णालयात गंभीर घटना घडत आहेत. त्यामुळे जर हे रूग्णालयच सुरक्षित नसेल तर येथे येणार रूग्ण कितपत सुरक्षित राहिल, असा प्रश्न येथे येणाऱ्या रूग्णांमधून उपस्थित होत आहे.




अलिबागमधील जिल्हा रूग्णालय हे जिल्ह्यातील सर्वसामान्य रूग्णांसाठीचा आधार आहे. या ठिकाणी मोफत उपचार मिळत असून दिवसाला शेकडो रूग्ण उपचारासाठी येत असतात. अगदीच खोकल्यापासून ते गंभीर आजारापर्यंतचे सर्व उपचार केले जातात. मात्र, त्याच जिल्हा रूग्णालयाला उपचार घेण्याची वेळ आली आहे. काही वर्षांपासून या रूग्णालयात गंभीर घटना घडत आहेत. त्यामुळे रूग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नुकतेच या रूग्णालयाच्या नुतनिकरणाचा नारळ फोडण्यात आला आहे. परंतु, त्याची एक विटही त्या ठिकाणी रचली गेलेली नाही. उलट सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हा रूग्णालयाच्या जुन्या इमारतीच्या डागडूजीतच समाधान वाटत असून त्यांना रूग्णांच्या जीवाशी काही एक लेणं देणं नसल्याची चर्चा रूग्णांमधून होत आहे.

आतापर्यंत सार्वजनिक विभागाकडून करोडोंचा खर्च रूग्णालयाच्या ईमारतीवर करण्यात आला आहे. मात्र, तरीदेखील या ठिकाणी गंभीर घटना होत आहे. बरा झालेला रूग्ण पण गंभीर जखमा घेऊन घरी परतेल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. नुकतीच अशीच एक गंभीर घटना घडली आहे. या जिल्हा सामान्य रूग्णालयातील दुसऱ्या मजल्यावरील मेल मेडिकल वॉर्डमध्ये स्लॅबसह पंखा देखील कोसळण्याची घटना सोमवारी घडली आहे. तो पंखा सुदैवाने रूग्णाच्या बाजूला पडल्यामुळे सुदैवाने जीवीतहानी टळली.

**संतोष राऊळ**

काही महिन्याभरापूर्वी रूग्णालयातील डायलेसीस सेंटरजवळ स्लॅब पडला होता. या घटनेनंतर लगेचच रविवारी (दि.६) मेल मेडिकल वॉर्डमधील स्लॅब कोसळला. दरम्यान, रूग्णालय प्रशासनाने बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून तातडीने दुरूस्ती करण्याचे सांगितले. सोमवारी (दि.७) सकाळी कामगारांनी दुरूस्तीचे काम सुरू केले. कोसळलेल्या स्लॅबचा भाग काढून त्या ठिकाणी नवीन स्लॅब टाकण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र, काम सुरू असतानाच गंज लागलेल्या सळईवरील सिलींग पंखा खाली कोसळला. तो पंखा उपचार सुरू असलेल्या रूग्णाच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत पडल्यामुळे सुदैवाने जीवितहानी टळली. कोणालाही दुखापत झाली नसल्याचे रूग्ण प्रशासनाने सांगितले. परंतु, अशा प्रकारच्या वारंवार घटना घडत आहेत. याआधी रूग्णालयाच कँटिनमधील स्लॅब पडण्याची देखील घटना घडली होती. पावसाळ्यात तर या ठिकाणी धबधबे वाहतात आणि रूग्णालयाला तळ्याचे स्वरूप येते. त्यावेळी देखील रूग्णांचे प्रचंड हाल होत असतात. तसेच, रूग्णालयच्या परिसरात कचऱ्याचे आणि दुर्गंधीचे साम्राज्य पसरलेले आहे. त्यामुळे आजारी रूग्ण अजून आजारी पडण्याची लक्षणे दिसतात.वारंवार घडत असणाऱ्या या घटनांमुळे रूग्णांसह डॉक्टर कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे रूग्णालयात उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रूग्णांसह त्यांच्यासोबत येणाऱ्या नातेवाईकांची तसेच कर्मचाऱ्यांची सुरक्षा वाऱ्यावर उसल्याचे स्पष्ट झाले आहे.त्यामुळे सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. सार्वजनिक विभागाकडून वेळोवेळी मलमपट्टी करून देखील अशा घटना घडत असल्यमुळे त्यांच्या कामाच्या दर्जावर देखील प्रश्न उपस्थित केला जात आहे. मुळात नव्या इमारतीसाठीची मंजुरी मिळाली असून त्याचा भुमीपूजन सोहळा देखील महायुती सरकार कडून मोठ्या थाटात पार पाडण्यात आला होता. असे असतानाही जुन्या इमारतीवर खर्च करणे कितपत योग्य, असा प्रश्न जनसामान्यांना पडत आहे. तसेच, संबंधित अधिकारी आपले खिसे गरम ठेवण्यासाठी नावापुरती डागडुजी करत असल्याच्या चर्चा देखील रंगत आहेत. त्यामुळे या गंभीर समस्येकडे रूग्ण प्रशासनाने तात्काळ लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे. जर यावर काही उपाययोजना केली गेली नाही तर हळू हळू स्लॅब कोसळता कोसळता रूग्णालयाची इमारतचे पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळेल, अशी भीती देखील रूग्णांसह सर्वसामान्यांतून व्यक्त होत आहे.

लोकसंसद

## बोगस डॉक्टरांवर कारवाई करा

पावसाळा सुरु झाला की शहरोशहरींच्या बोगस डॉवटरांवरील कारवाईचा प्रश्न चर्चेत येतो. योग्य ते वैद्यकीय शिक्षण न घेतलेले अनेकजण वेगवेगळ्या महानगरांत, शहरी-निमशहरी भागांत, गावा-खेड्यात आपापले दवाखाने थाटून बसलेले असतात. ग्रामीण भागात तर या बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट असतो. विशेषतः बंगालहून आलेल्या या बोगस डॉक्टरांनी कोणत्याही प्रकारचे वैद्यकीय शिक्षण घेतलेले नसते. त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारची वैद्यकीय क्षेत्रातील पदवी नसते तरीही ते बिनदिक्कतपणे रुग्णांवर उपचार करतात. त्यांच्या अयोग्य उपचारांमुळे रुग्णांचे प्राण धोक्यात आल्याची, रुग्ण दगावल्याचीही अनेक उदाहरणे आहेत. शासन निर्णयानुसार जिल्हा, तालुकास्तरावर समित्या निर्माण करुन वैद्यकीय व्यवसायातील व्यक्तींच्या दवाखान्यांना भेटी देत त्यांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करुन त्याबद्दलचा अहवाल महापालिका स्तरावरील समितीकडे पाठवण्याची व्यवस्था आहे. तरीही बोगस डॉक्टर्स व त्यांचे दवाखाने विविध ठिकाणी पाहायला मिळतातच याचाच अर्थ या बोगस डॉक्टरांना कशाचीही भीती नाही. वैद्यकीय क्षेत्रातील कोणतीही पदवी नसतानाही आपण रुग्णांवर उपचार केले तरी आपल्यावर कोणतीही कारवाई होणार नाही अशीच धारणा या बोगस डॉक्टरांची झालेली दिसते म्हणूनच गावोगावी दवाखाने थाटून बसलेल्या आणि अयोग्य उपचार करून रुग्णांचा जीव धोक्यात घालणाऱ्या या बोगस डॉक्टरांवर सरकारने कठोर कारवाई करावी.

**– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

## अल्पवयीन स्टंटबाजांना कोण आवर घालणार?

नवी मुंबईतील नेरुळ येथे एका १६ वर्षांच्या अल्पवयीन मुलाला रेल्वे ट्रेनच्या टपावर चढून रिल बनवण्याच्या नादात विजेच्या तारांशी संपर्क आल्याने भाजल्यामुळे गंभीर दुखापत झाल्याची घटना ताजी असतानाच ओडिशा राज्यातील अल्पवयीन मुलांचा काळजात धडकी भरवणारा एक व्हिडिओ सध्या प्रचंड व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये एक अल्पवयीन मुलगा रेल्वे रुळांखाली असलेल्या काँक्रीटच्या दोन स्लीपरच्या मध्ये दगडांमध्ये पडून आहे आणि त्याचे मित्र त्याच्या अंगावरुन जाणाऱ्या रेल्वेचा व्हिडिओ बनवत आहेत. हा व्हिडिओ ओडिशातील पूर्णापानी आणि झारमुंडा रेल्वे स्थानकांदरम्यान चित्रित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. यावेळी त्या मुलाची किंचितशी जरी चूक झाली असती तर ती त्याच्या जीवावर बेतली असती. सुदैवाने अशी जीवघेणी स्टंटबाजी करताना त्याचे प्राण वाचले.

**– प्रदीप मोरे, अंधेरी**


दिनविशेष

# गुरुः साक्षात् परब्रह्म!

'गुरु ब्रह्मा गुरु विष्णु, गुरु देवो महेश्वरा गुरु साक्षात् परब्रह्म, तस्मै श्री गुरुवे नमः... धर्मग्रंथांमध्ये गुरुंनाही देवाप्रमाणे मानलं गेलं आहे. यामुळे भारतात गुरुपूजेचे अधिक महत्व आहे. या दिवशी दान आणि गुरूंना गुरुदक्षिणा दिली जाते. तसेच गुरुंची आणि आपल्या आराध्य देवी-देवतांची पूजा केली जाते.

गुरुपौर्णिमा हा सण साजरा करण्यामागील मुख्य कारण म्हणजे महर्षी वेदव्यास यांचा जन्मदिन. महर्षी वेदव्यास भगवान विष्णूचे अंश म्हणून पृथ्वीवर आले असे म्हटले जाते. त्यांच्या वडिलांचे नाव ऋषी पराशर आणि आईचे नाव सत्यवती होते. त्यांना लहानपणापासूनच अध्यात्मची आवड होती. ते पूर्ण करण्यासाठी त्यांनी आपल्या आई-वडिलांकडे देवाचे दर्शन घेण्याची इच्छा व्यक्त केली आणि जंगलात तपश्चर्या करण्यास सुरुवात केली. पण त्यांच्या आई-वडिलांनी ही इच्छा नाकारली.

महर्षि वेदव्यास यांनी आईकडे हट्ट धरुन त्यांनी तपश्चर्या करण्यासाठी वनात ते गेले. त्यांनी त्या ठिकाणी कठोर तपश्चर्या केली. या तपश्चर्यामुळे त्यांना संस्कृत




भाषेत प्राविण्य प्राप्त झाले. त्यानंतर त्यांनी चार वेदांचा विस्तार केला. त्यांनी महाभारत, अठरा महापुराण आणि ब्रह्मास्त्र रचले, त्यांना असे वरदान मिळाले होते. त्यामुळे हिंदू धर्मात वेदव्यास यांना देव म्हणून पूजले जाते. आजही वेदांचे ज्ञान घेण्यापूर्वी महर्षी वेदव्यास यांचे नाव प्रथम घेतले जाते. गुरु म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे नेणे. गुरू तुम्हाला अंधारातून म्हणजे संकटातून प्रकाशाकडे म्हणजे यशाकडे घेऊन जातो. महर्षी वेदव्यास यांनी मानवजातीला प्रथमच चार वेदांचे ज्ञान देऊन त्यांचा परिचय करून दिला, असे म्हणतात. वेदव्यास हा भगवान विष्णूचा अवतारदेखील मानले जातात. त्यामुळे गुरुपौर्णिमेच्या दिवशी गुरुंच्या पूजेबरोबरच भगवान विष्णू किंवा भगवान शालिग्रामचीही पूजा केली जाते. जेणेकरून गुरु रूपातील भगवान विष्णूही प्रसन्न होऊ शकतात. गुरुपौर्णिमेच्या दिवशी शिक्षकांचा आदर करणे आणि त्यांना गुरुदक्षिणा देणे अत्यंत महत्वाचे आहे. असे मानले जाते की गुरु, गुरुसमान ज्येष्ठांना आदर आणि सन्मान देऊन कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. मगुरु गोविंद दोघ खडे काके लागु पाये बलिहारी गुरु आपने गोविंद दियो बतायेफ असेही म्हटले आहे. याचा अर्थ गुरू हाच माणसाला देवासमोर आणतो. भगवंताची माहिती फक्त गुरूच देतात. त्यामुळे गुरुची तुलना देवाच्याबरोबर मानले जाते. गुरुपौर्णिमेच्या दिवशी गुरुची नाही तर कुटुंबातील मोठ्या लोकांची तसेच आई-वडिलांना गुरु समान मानले पाहिजे.गुरुंच्या कृपेने विद्यार्थ्यांना ज्ञान प्राप्त होते. गुरुपौर्णिमेच्या दिवशी व्यास मुनींचा फोटो ठेवून दिवा आणि उदबत्ती लावा. तसेच फुले, फळे, मिठाई आणि इतर शुभ वस्तू अर्पण करा.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० जुलै
१) श्री. मोहन कानू वर्तक वरसोली, १०-७-१९४९
२) श्री. हरिश्चंद्र रामा बामजी आक्षी, अलिबाग, १०-७-१९४४
३) श्री. प्रवीण परशराम मोरे अलिबाग, १०-७-१९५२
४) श्री. परमानंद नकछेद सिंह नवगाव, अलिबाग, १०-७-१९६१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**तरूण नंदकुमार सक्सेरिया, मुंबई**

**श्रीराम, गुरूपौर्णिमेनिमित्त अलिबाग**

## गुरु-शिष्य अद्वितीय जोडी



आपले सद्गुरु श्री मच्छिंद्रनाथ यांच्या आश्रमात त्यांचे शिष्य श्री गोरखनाथ सेवेसाठी राहत असत.

रोज त्रिकाल साधना, ग्रंथ वाचन, सकाळी सद्गुरूंसाठी भिक्षा सेवा, दिवसभर त्यांच्या सेवेत राहणे, गुरूंच्या दिव्य ज्ञान संदेशावर मनन, चिंतन असा त्यांचा दिनक्रम असे. सकाळची दैनंदिन साधना, नैमित्तिक कर्म झाल्यानंतर श्री गोरखनाथ आपल्या गुरूंसाठी पाच घरी भिक्षा आणण्यासाठी बाहेर पडत असत. भिक्षा आणून झाल्यानंतर ते आश्रमात गुरु सेवेसाठी येत असत. एके दिवशी श्री गोरखनाथ यांनी भिक्षेत मागून आणलेला वडा सद्गुरू मच्छिंद्रनाथांना खूप आवडला. त्यांनी श्री गोरखनाथ यांना बोलावून घेतले आणि जेथून हा वडा आणला होता त्या घरी जाऊन आणखी दोन वडे आणण्याची आज्ञा केली. ज्या ताईंनी भिक्षेमध्ये वडा घातला होता त्या ताईंकडे श्री गोरखनाथ गेले. आणि त्यांना पुन्हा दोन वडे देण्याबद्दल हात जोडून विनंती केली. त्या बाईंनी पुन्हा वडे देण्यास नकार दिला. हे कोणीतरी भिक्षा मागणारे गोसावडे आहेत असे तिला वाटले आणि ती चेष्टेने त्यांना म्हणाली. तुझा एक डोळा देशील मला, तरच मी देईन वडे. शिष्य गोरखनाथ यांनी त्या बाईंच्या लक्षात येण्यापूर्वी आपला डोळा काढून तिच्यासमोर ठेवला. त्या बाई थरथर कापायला लागल्या. त्यांना खूप वाईट वाटले.तिने ताबडतोब वड्याचे पीठ भिजवले. आणि दोन वडे त्या भिक्षेकरी यांच्या स्वाधीन केले.

**सद्गुरु स्वामी बोध**

आपल्या व्यावहारिक बुद्धीला हे सर्व काल्पनिक वाटण्याचा संभव आहे. परंतु सद्गुरु माऊली ज्यांचे लेकराप्रमाणे कौतुक करतात, ज्यांचे सर्व प्रकारचे हट्ट पुरवतात आणि आपले सर्व वैभव ज्यांना प्रदान करतात ती शिष्य मंडळी अशा तोलामोलाची असावी लागतात. असे निष्ठावंत शिष्य खऱ्या अर्थाने सद्गुरूंना शरण गेलेले असतात. असे शिष्य सर्व बाबतीत सद्गुरूंशी एकरूप झालेले असतात. त्यांना प्रपंचाची आठवणही नसते. आत्म समर्पणाशिवाय दास्यत्व कधीही फलद्रूप होत नाही. गुरु सेवेतील दिव्या आनंदा प्रित्यर्थ ज्या शिष्य गणांनी आपले तन मन प्राण किंबहुना आपले सर्वस्व सद्गुरु चरणी समर्पित केलेले आहे. असे एकनिष्ठ सेवक शिष्य सद्गुरूंच्या अमर्यादा आनंदाचे आणि सत्तेचे वारस बनतात.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

# रत्नागिरीकरांना डेंग्यूचा धोका

## •जूनअखेर सात रुग्ण आढळले • आरोग्य विभागाकडून जनजागृती

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

रत्नागिरी जिल्ह्यात डेंग्यूचे रुग्ण वाढू नयेत यासाठी आरोग्य विभागाकडून जनजागृती केली जात आहे. त्यामुळे यावर्षी डेंग्यूचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहेत. जूनअखेर केवळ ७ रुग्ण आढळले आहेत. गेल्या वर्षी ही संख्या २५६ होती.



पावसाळा सुरू झाला आहे तसेच हवामानातील सतत बदल, वातावरणातील बदल यामुळे तालुक्यात डेंगीचा धोका निर्माण झाला आहे. डासांमुळे डेंग्यूची लागण होण्याचा धोका आहे. हा धोका ओळखून आरोग्य विभागाने जानेवारीपासून जूनपर्यंत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर उपाययोजना राबवल्या आहेत. त्यामुळे यंदा डेंग्यूचे रुग्ण कमी झाले आहेत. याबाबत माहिती देताना जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. संतोष यादव म्हणाले, डासांमुळे पसरणारा विषाणूजन्य रोग आहे. संक्रमित डास चावल्यास विषाणू त्याच्या शरीरात प्रवेश करतो आणि यातून डेंग्यूचा संसर्ग होतो. त्यामुळे पांढऱ्या पेशी कमी होण्याचा धोका कायम असतो. उच्चताप, डोकेदुखी, स्नायू आणि सांध्यांमध्ये वेदना, मळमळ, उलट्या, त्वचेवर पुरळ आणि थकवा ही डेंग्यूची लक्षणे आहेत. सध्या पावसाळी हंगाम सुरू झाला आहे. ठिकठिकाणी पाणी साचले जात आहे. त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका आहे त्यामुळे आम्ही नागरिकांमध्ये प्रथम जनजागृती केली. ज्या भागात डेंग्यूचे रुग्ण आढळतात त्या भागात औषध फवारणी केली. आदिवासी भागात डेंग्यूचे रुग्ण सापडण्याचे प्रमाण जास्त आहे. चिपळूणमध्ये दरवर्षी डेंगीचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर आढळतात. आदिवासी भागात डेंग्यूचे रुग्ण सापडण्याचे प्रमाण जास्त असते आणि त्याच ठिकाणी जनजागृती केली आहे.

तरीही सायंकाळी व पहाटेच्यावेळी डासांचे संकट ग्रामीण भागासह शहरी भागात सुरू आहे. या डासांच्या दंशामुळे तापाची साथ वाढण्याचा धोका आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेतली पाहिजे. तापाची साथ असल्यास त्वरित वैद्यकीय अधिकारी यांना कळवण्याचे आवाहन करण्यात आले असून, जलद ताप सर्वेक्षण करण्याचे आवाहन केले आहे.

### 'आइल बॉल' संकल्पना

डासमुक्तीसाठी 'ऑइल बॉल' संकल्पना ठिकठिकाणी औषध फवारणी बरोबरच ऑइल बॉल ही संकल्पना राबवली आहे. त्यात एका बॉलमध्ये ऑइल टाकले जाते. तो बॉल पाण्यात टाकल्यानंतर ऑइल पसरते आणि पाण्यात असलेले डेंगीचे जिवाणू अंडी मरतात. त्यामुळे हा रोग पसरत नाही. डासांपासून मुक्ती मिळावी यासाठी अनेकजण आपापल्यापरिने प्रयत्न करत आहेत.

> धूरफवारणी, डासोत्पती स्थाने नष्ट करणे, पाणीसाठ्यांमध्ये गप्पी मासे सोडणे अशा उपाययोजनाही सुरू आहेत.
>
> - डॉ. संतोष यादव, जिल्हा हिवताप अधिकारी.

# घरडा महाविद्यालयाचा सामंजस्य करार

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

घरडा अभियांत्रिकी महाविद्यालय लवेल येथील इलेक्ट्रानिक्स आणि टेलिकम्युनिकेशन विभागातर्फे विविध औद्योगिक संस्थासोबत विद्यार्थी प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार करण्यात आले. घरडा महाविद्यालयाच्या परिसरामध्येच डॉ. घरडासरांच्या प्रेरणेने सुरु करण्यात आलेले हुशांग पटेल टेक सेंटर हे सोलार तंत्रज्ञानमध्ये कार्यरत असलेले केंद्र असून येथे विविध प्रकारचे अद्यावत सोलर पॅनेल तसेच सौरउर्जेवर चालणारे लहान, मध्यम व मोठ्या आकाराचे बॅटरी संच बनविण्यात येतात.

घरडा महाविद्यालयातील इलेक्ट्रानिक्स विभागातील विद्यार्थ्यांना सत्रादरम्यान प्रशिक्षण दिले जाते. दुऱ्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना येथे कौशल्य आधारीत प्रशिक्षण दिले जाते तसेच छोट्या छोट्या इलेक्ट्रानिक्स प्रोजेक्टसाठी मार्गदर्शन केले जाते. तसेच विद्यार्थ्यांना इलेक्ट्रानिक्स सर्किट डिझाईन आणि मॅन्युफॅचरींग पध्दती संदर्भात प्रशिक्षण दिले जाते.

तिसऱ्या आणि चौथ्या वर्षातील विद्यार्थी या प्रशिक्षणाच्या जोरावर आपले मेजर प्रोजेक्ट निवडतात. यामध्ये होशगं टेक सेंटरकडून मुलांना प्रोजेक्टसाठी लागणारे साहित्य पुरविले जाते. या सेंटरमार्फत प्रशिक्षण घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना विविध कंपन्यामध्ये काम करण्याची संधी मिळते.

सध्याच्या इलेक्ट्रानिक्स इंडस्ट्रीजमधील वाढती गरज पाहता विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान शिकण्याचा फायदा त्यांच्या भावी जीवनात नक्कीच होईल असे मत घरडा इलेक्ट्रानिक्स आणि टेलिकम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. सचिन खेडेकर यानी व्यक्त केले. या सामंजस्य करारासाठी प्राचार्य डॉ. प्रमोद पाटील व हुशांग टेक सेंटरचे कार्यकारी प्रमुख डा. रंगा यांचे मोलाचे सहाकार्य लाभले.

# धामणंद प्रभागाची शिक्षण परिषद उत्साहात

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

खेड तालुक्यातील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील माहे जून २०२५ ची शिक्षण परिषद न्यू इंग्लिश स्कूल आंबडस, ता. खेड येथे घेण्यात आली. प्रभागाच्या शिक्षण विस्तार अधिकारी विद्या विलास गुजर यांचे अध्यक्षतेखाली सदर शिक्षण परिषद संपन्न झाली.



शिक्षण परिषदेमध्ये सन २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार खेड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी विजय बाईत यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच नासा- इस्त्रो, प्रज्ञाशोध, नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेमध्ये प्राविण्य मिळवलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचाही सत्कार सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यानंतर इयत्ता पहिली नवीन अभ्यासक्रम, पायाभूत शिक्षण या विषयावर शाळा साखर चौकीची येथील शिक्षक रुपेश उतेकर यांनी मार्गदर्शन केले.


चर्चासत्रात सर्वांनी सहभाग घेतला. केंद्र संसाधन गट स्थापना यावर संगीता वागरे मुख्याध्यापक शाळा पोसरे तांबड यांनी मार्गदर्शन केले. शाळा पोसरे खुर्द येथील मुख्याध्यापक विजय साखरे यांनी शिष्यवृत्ती परीक्षा संदर्भात मार्गदर्शन केले. गटशिक्षणाधिकारी विजय बाईत यांनी उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले. प्रियांका पंडित, संपदा पत्याणे, माळी-परगे यांनीही उपस्थिताना मार्गदर्शन केले.

विस्तार अधिकारी विद्या गुजर यांनी प्रशासकीय कामकाजाचा आढावा घेऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय शिंदे यांनी केले. शिक्षण परिषद यशस्वी होण्यासाठी प्रभागातील सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले. सर्व मान्यवरांचे आभार आंबडस नंबर १ शाळेचे मुख्याध्यापक संतोष उतेकर यांनी व्यक्त केले.

# 'गणपती विसर्जन घाटाची व्यवस्था न झाल्यास आंदोलन'

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

गणपती विसर्जन करण्याची कोणतीही सुविधा गेली दोन वर्षे पुलाजवळ उपलब्ध नसल्यामुळे यंदा देखील जर प्रशासनाने योग्य ती व्यवस्था केली नाही, तर आम्ही आंदोलन करू, असा इशारा चिपळूण पंचायत समितीचे माजी सभापती शौकत मुकादम यांनी दिला आहे.




बहादूरशेख आणि कळंबस्तेजवळील जुने दोन पुल तोडण्यात आल्यामुळे नव्याने बांधलेल्या पुलाजवळ जाण्यासाठी कोणताही रस्ता उपलब्ध नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

याठिकाणी ओझरवाडी, मवतवाडी, मोकंबवाडी, गांधी नगर, कळंबस्ते, येशील आदी परिसरातील हजारो नागरिक गणेश विसर्जनासाठी येत असतात. या भागात विसर्जनासाठी योग्य ठिकाण निश्चित करून विसर्जन घाट बांधण्याची मागणी गेल्या दोन महिन्यांपूर्वीच प्रशासनाकडे लेखी स्वरूपात करण्यात आली होती. मात्र अद्याप कोणत्याही अधिकाऱ्यांनी या ठिकाणी पाहणी करून नियोजन किंवा उपाययोजना केलेली नाही, असा आरोपही त्यांनी केला. २५ ते ३० दिवसांच्या आत जर विसर्जन घाटाच्या बांधकामास सुरुवात झाली नाही, तर आम्ही सर्व पक्षीय आंदोलन छेडू, असा स्पष्ट इशाराही मुकादम यांनी दिला आहे. त्याबाबतचा लेखी पत्रव्यवहार त्यांनी मुंबई-गोवा महामार्ग विभाग, पोलीस प्रशासन, उपविभागीय अधिकारी आणि चिपळूणचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवला आहे.

# धबधब्यांसह धरणांवर प्रशासनाने ठेवला वॉच

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

यंदा मे महिन्यात सुरू झालेल्या पावसाचा जोर जून महिन्यातही कायम होता. त्यामुळे चिपळूण तालुक्यासह जिल्ह्यातील बहुसंख्य धबधबे प्रवाहित झाले असून, धरणेही भरून वाहू लागली आहेत. त्यामुळे पावसाळी पर्यटनाला चालना मिळाली आहे; मात्र अतिउत्साहाच्या भरात किंवा बेशिस्त वागण्यामुळे अनेकवेळा दुर्घटना घडतात. त्याला आळा घालण्यासाठी स्थानिक प्रशासनाकडून धबधब्यांच्या ठिकाणी निर्बंध घातले आहेत तर पाटबंधारे विभागाकडून धरणांवर सुरक्षारक्षकांची नेमणूक केली आहे. धरण परिसरातील अतिसंवेदनशील व जीविताला धोका ठरेल, अशा भागात जाण्यास पर्यटकांना मनाई करण्यात आली आहे. चिपळूण तालुक्यातील पर्यटनस्थळे आणि एक किलोमीटर परिसरातील धबधब्यांच्या ठिकाणी बंदी घालण्यात आली आहे. तिथे



जीवित व वित्तहानी होऊ नये तसेच सरकारी व खासगी मालमत्तेचे नुकसान होऊ नये, पर्यटकांची सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत राहावी यासाठी ही प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. चिपळूण तालुक्यात पेढे येथील सवतसडा, तिवरे, अकले, अडरे, कामथे घाट, परशुराम घाट आणि कुंभार्ली घाटासह तालुक्यातील अनेक ठिकाणी लहान-मोठे धबधबे पावसाळ्यात नैसर्गिक पद्धतीने तयार होतात. तसेच काही गावांमध्ये धरणे पूर्णक्षमतेने भरलेली आहेत. सांडव्यावरून पाणी वाहत आहे. तिथे आपसूकच धबधबे तयार होतात. तिवरे, अनारी गावात हे अनुभव मिळत आहे. हे धबधबे सध्या गैरकृत्यासाठी प्रसिद्ध आहेत. अनेकवेळा महाविद्यालयीन तरुण-तरुणी या धबधब्यावर पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी धाव घेतात. त्यांची स्थानिक ग्रामस्थांबरोबर वादावादीही होते. त्यामुळे त्या परिसरात अनुचित प्रकार टाळण्यासाठी योग्य त्या सूचना तालुका प्रशासनाकडून दिलेल्या आहेत. धबधब्यांच्या परिसरात फलकपावसामुळे निर्माण झालेले नैसर्गिक धबधबे, धरण परिसरात मद्यपान, मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक किंवा मद्यविक्रीला मज्जाव करण्यात आला आहे. धोकादायक ठिकाणे, वळणे, धबधबे, दऱ्यांचे कठडे आदी ठिकाणी सेल्फी काढण्यावर निर्बंध घातलेले आहेत. सेल्फी काढताना काहीवेळी जीवावर बेतणारे स्टंट केले जातात, त्यासाठी हा निर्णय पोलिस प्रशासनाने घेतला आहे तसेच खोल पाण्यात उतरून पोहणे, सार्वजनिक ठिकाणी खाद्यपदार्थ, कचरा, प्लास्टिकच्या बाटल्या, थर्माकोलच साहित्य फेकणे, टिंगलटवाळी करणे, असभ्य वर्तन करणे, जलप्रदूषण टाळणे अशी कोणतीही कृती धबधब्यांच्या किंवा धरणाच्या एक किलोमीटर परिसरात करू नये, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. दुचाकी, चारचाकी व सहाचाकी वाहनांना प्रवेश (अत्यावश्यक सेवा वगळून) बंदी असून नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्यात येणार आहे, असे फलक पोलिस विभागाकडून धबधब्याच्या ठिकाणी लावण्यात आले आहेत.

> समाधानकारक पावसामुळे लघुपाटबंधारे प्रकल्प भरलेले आहेत. काही ठिकाणी सांडव्यावरून पाणी जात आहे. त्यामुळे धरण परिसरात अनुचित प्रकार घडू नये यासाठी काळजी घेण्यात आली आहे.
>
> - विवेक सोनार, पाटबंधारे विभाग.

> चिपळूण तालुक्यातील धबधबे आणि धरणावर बंदीचे प्रशासनाकडून आदेश आलेले नाहीत; परंतु सतर्कता म्हणून स्थानिक पातळीवर उपाययोजना केल्या आहेत.
>
> - फुलचंद मेंगडे, पोलीस निरीक्षक चिपळूण रत्नागिरी.

# खेड भागातील कुटुंबांना स्थलांतराची नोटीस

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

शहरातील खेंड कांगणेवाडी येथे दरडीसह दोन महिन्यापूर्वी बांधलेली संरक्षक भिंतही कोसळल्याने या भागातील घरांसह एका बहुमजली इमारतीला धोका निर्माण झाला आहे. ही घटना शनिवारी दुपारी तीनच्या सुमारास घडली असून मुख्याधिकारी विशाल भोसले यांच्यासह अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहाणी केली. दरम्यान, सुरक्षेची खबरदारी म्हणून नगर पालिका प्रशासनाने या भागातील ९ कुटुंबांना तातडीने स्थलांतरीत होण्याची नोटीस बजावली आहे.

गेले दोन दिवस चिपळूण परिसरात जोरदार पाऊस कोसळत आहे. सातत्याने सरीवर सरी पडत असून या पावसामुळे शनिवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास खंड कांगणेवाडी येथे दरड कोसळून संरक्षक भिंत देखील कोसळली आहे. एकाच ठिकाणी दोन संरक्षक भिंत नगर पालिकेकडून उभारण्यात आल्या होत्या. अनेक वर्षे याठिकाणी दरडीचा धोका आहे. २००२ मध्ये व त्यानंतर २००५ मध्ये देखील याठिकाणी संरक्षक भिंत कोसळल्याची घटना घडली होती. त्यावर उपाययोजना म्हणून स्थानिक ठेकेदाराकडून सुमारे २५ लाख रूपये खर्चातून संरक्षक भिंत उभारण्यात आली होती. मात्र अवघ्या दोन महिन्याच्या कालावधीतच संरक्षक भिंतीसह दरडही खाली आली आहे. या दरडीच्या वरच्या भागात व पायथ्यालाही दाट वस्ती आहे. दरडीच्या वरील भागात जाधव, राणिम आणि शिंदे यांची घरे असून त्यांना तातडीने घर खाली करून स्थलांतरीत होण्याच्या सूचना करण्यात आल्या.

सद्यस्थितीत पावसाचा जोर कायम असल्याने संबंधीत कुटुंबांच्या स्थलांतरा व्यतिरीक्त कोणताही पर्याय राहिलेला नाही. मात्र पावसाचा जोर कमी होताच या ठिकाणी उपाययोजना केल्या जाणार असल्याचे नगर पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# कोमसापतर्फे श्रावणधारा मनामनात कार्यक्रमाचे आयोजन

**| रत्नागिरी | वार्ताहर |**

कोकण मराठी साहित्य परिषदेची मालगुंड शाखा, कवी केशवसुत स्मारक व्यवस्थापन समिती, केशवसुत सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय आणि युवाश शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने श्रावणधारा मनामनात हा उपक्रम २६ जुलै रोजी मालगुंड येथे आयोजित केला आहे. कोकण मराठी साहित्य परिषद शाखा मालगुंडतर्फे दरवर्षी या उपक्रमाचे आयोजन केले जाते. या माध्यमातून मालगुंड परिसरातील अनेक नव्याने लिहिणाऱ्या व कवितेच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त करणाऱ्या साहित्यप्रेमींना संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या कार्यक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कवींनी शालेय गटासाठी शुभदा मुळ्ये, विलास राणे, उज्ज्वला बापट, महाविद्यालयीन गटासाठी अरुण मोर्ये तर खुल्या गटासाठी रामानंद लिमये व अमेय धोपटकर यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन कोमसाप मालगुंड शाखेच्या अध्यक्षा नलिनी खेर यांनी केले आहे.

## कोकणात २९ हजार हेक्टर क्षेत्रावर लागवड | कामे पूर्ण होण्यास दहा दिवसांचा विलंब

# भात लागवडीसाठी शेतकऱ्यांची लगबग

**| रत्नागिरी | वार्ताहर |**

कोकणात सध्या पावसाची जोरदार बॅटिंग सुरू आहे. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून खरीप पेरण्या अंतिम टप्प्यावर आल्या आहेत. दरम्यान, जिल्ह्यात आतापर्यंत २८ हजार ८६३.९५ हेक्टर क्षेत्रावर भात पुनर्रलागवड करण्यात आले आहे. उर्वरित भात लागवडीसाठी शेतकऱ्यांकडून मोठी लगबग सुरू आहे. कोकणात यंदा मान्सून पूर्व पाऊस आठ दिवस आधीच आला. मात्र धो-धो



पाऊस झाला. त्यामुळे मोठे नुकसान झाले होते. शेतकऱ्यांनी मान्सूनला सुरूवात झाली या अपेक्षेने खरीपपूर्व कामे मे मध्ये केली. शेतमळ्यांची साफसफाई करणे, पुनर्रलागवड करणाऱ्या जागांची सफाई, शेतात नांगरणी करून घेतली. मान्सूचा पाऊस दमदार झाल्यानंतर खरीप पेरण्यास सुरुवात झाली. दरम्यान, यंदा जिल्ह्यातील भात व नाचणी पिकाचे लक्ष्य ५२ हजार ५२२ हेक्टर क्षेत्रावर असून आतापर्यंत २८ हजार ८६३.९५ हेक्टर क्षेत्रावर पुनर्रलागवड झाली आहे. दरम्यान, जुलै महिन्यात ५० टक्के लागवड होण्याचे अपेक्षित होते. मात्र अनियमित पावसामुळे भात पुनर्रलागवड कमी झाल्याचे सांगण्यात आले. यावर्षी भात लावण्यांची कामे पूर्ण होण्यास दहा दिवसांचा विलंब होईल असे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.

> रत्नागिरी जिल्ह्यात आतापर्यंत २८ हजार हेक्टरवर खरीप हंगाम पुनर्रलागवड क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. उर्वरित पेरण्यासाठी शेतकऱ्याकडून लगबग सुरू आहे. या महिन्यात पेरण्या पूर्ण होतील.
>
> -शिवकुमार सदाफुले, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, रत्नागिरी.

# निवडक



## वन विभागातर्फे विद्यार्थ्यांना झाडांचे वाटप

**नेरळ :** कर्जत वन विभाग पश्चिम यांच्या वतीने दोन शाळांमध्ये वृक्ष संवर्धनाचे महत्व विशद करीत शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक झाड देण्यात आले. तालुक्यातील भाऊ साहेब राऊत माध्यमिक विद्यालय चिंचवली डिकसळ आणि शारदा इंग्लिश मिडीयम स्कुल डिकसळ येथे वृक्ष दिंडी काढून वृक्षारोपण कार्यक्रम करण्यात आला. वन विभागाचे वनक्षेत्रापाल समीर खेडेकर यांच्या संकल्पनेतून भाऊ साहेब राऊत विद्यालय चिंचवली डिकसळ येथे शाळेतील विद्यार्थी यांना झाडे लावावी यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांना एक रोप देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी शाळेच्या वतीने वृक्ष दिंडी काढून वृक्ष संवर्धनाचे महत्त्व विशद केले. तसेच विद्यार्थ्यांना झाडाचे रोप देण्यात आले. यावेळी वन क्षेत्रपाल समीर खेडेकर, शाळेच्या मुख्याध्यापिका राणे, सामाजिक वनीकरण अधिकारी मिलिंद राऊत, निवृत शिंदे, श्याम पाटील, किरण ठाकूर, सूरज ठाकूर तसेच अनेक पालक आदी हे उपस्थित होते.




## भादाव येथे मोफत नेत्र तपासणी

**पाली/बेणसे :** भादाव गावात मोफत नेत्र तपासणी शिबीर संपन्न झाले. तब्बल ९६ गरजूंनी या शिबिराचा लाभ घेतला. यातील १८ जणांवर शस्त्रक्रिया होणार असून त्यांना पनवेल येथे शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले आहे. ॲड. राजीव साबळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून डॉ. सुहास हळदीपुरकर यांचे लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल, गोसावी समाज भादाव, राजेश मेहता व निशा नवघरे यांच्या संयुक्त विद्यामाने हे मोफत नेत्र तपासणी शिबीर आयोजित केले होते. या शिबिरामध्ये मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली जाणार असून चष्मे देखील देण्यात येणार आहेत. या शिबिरात ग्रामस्थ मंडळ भादाव, नगरसेवक, आशा सेविका, अंगणवाडी सेविका व आरोग्य सेवक उपस्थित होते.



## निसर्ग मित्र पुरस्कार प्रदान

**चिरनेर :** केळवणे येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलमध्ये एकविरा कला, क्रीडा, सामाजिक आणि शैक्षणिक संस्था पनवेल व बी.के. पाटील फाऊंडेशन, केळवणे यांच्या वतीने थोर निरुपणकार महाराष्ट्र भुषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने बंधारा सुरक्षित करण्यासाठी झाडांचे वाटप करण्यात आले. तसेच डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी निसर्ग मित्र पुरस्कार वितरण सोहळा (दि.८) जुलै रोजी पार पडला. याप्रसंगी उपसरपंच सुवर्णा गावंड, ग्रामपंचायत सदस्या आरती कोळी, सामाजिक कार्यकर्ते भोईर व शाळेचे मुख्याध्यापक उपस्थित होते. तेजस पाटील आणि विशाल घरत यांनी झाडांचे वाटप केले. यावेळी किरण कोळी,प्रॉमिस कोळी,गुरुनाथ पाटील यांना डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी निसर्ग मित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. अकाऊंटंट (Accountant -Tally ERP+ GST, Advance Excel) वेटर, रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मो. ७५५९१८४६१२
- नारळ पाहिजेत - आमच्याकडे नारळ विकत घेतले जातील. निर्वा इंटरप्रायझेस, आक्षी, अलिबाग मो नं. ९३७१२६३०३१/ ९७६३२५३०३१
- शिवानी पेटशॉप अलिबाग/चोंढी/पेण येथे कामाकरिता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. ९२७२३८३४७६
- पाहिजेत- सिमरन मार्टस सेल्स साठी मुले-मुलींची भरती ; अनुभवी-बिन अनुभवी; शिक्षण कमीत कमी ग्रॅज्युवेशन पास Walking Interview दिनांक - १५-१६ जुलै २०२५ रोजी वेळ ११ ते १.
संपर्क - R.C.F. Colony Gate, Veshwi, Tal-Alibag
Mob. No-9223161461 / 9223161537
- हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहे. १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास, ४) X-RAY साठी मुले, आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र सोबत आणावे. संपर्क : ७७४५०५००२५/९११९५६५०२२/९३२१३०३९३८
- अलिबागमधील थळमध्ये गर्व्हनमेंट फॅक्टरीकरीता फॅटरी सुपरवायझर, हाऊसकीपिंग, सुपरवायझर, सिक्युरिटी ऑफिसर त्वरीत पाहिजे. संपर्क : ९८२१२७६२६१
- पांढरे डाग करा मुळापासून नष्ट : औषधामध्ये आहे याचा परिणाम या औषधाचा करा वापर पांढरे डागापासून मिळवा मुक्ती. संपर्क : ८९६९१३५३८९ यावर कॉल करा. घरीबसल्या औषध मिळवा.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# कोप्रोलीचे ग्रामीण रुग्णालय व्हेंटिलेटरवर

## डॉक्टरांच्या निवासी संकुलाचा अभाव, रुग्णालयात अनेक रिक्त पदे



**। उरण । वार्ताहर ।**

ग्रामीण विभागातील रुग्णांसाठी कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्र हे एकमेव रुग्णालय आहे. मात्र, या रुग्णालयात पुरुष डॉक्टरांचा अभाव, परिचारिका यांची २४ रिक्त पदे, डॉक्टरांच्या निवासी संकुलाचा अभाव, सुरक्षकाचा अभाव अशा एक ना अनेक कारणांमुळे रात्र पातळीवर डॉक्टर रुग्णालयात थांबत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. तरी उरणचे आ. महेश बालदी यांनी सदर रुग्णालयाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी ग्रामीण भागातील जनता विशेष करून आदिवासी बांधव व्यक्त करत आहे. उरण हा खेड्यापाड्या बरोबर आदिवासी वाड्यांनी वसलेला तालुका आहे.

या उलट ग्रामीण भागात असलेले कोप्रोली रुग्णालय हे ग्रामीण रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. त्यामुळे उरण परिसरातील विशेषता ग्रामीण भागातील गरीब, गरजु रुग्ण उपचारासाठी कोप्रोली आरोग्य केंद्राच्या आश्रयाला येतात. जिल्हा परिषद, स्थानिक आमदार आणि आरोग्य विभाग यंत्रणा यांच्या डोळेझाक कारभारामुळे हे रुग्णालय व्हेंटिलेटरवर सध्या आहे. त्यात अडगळीच्या ठिकाणी असलेल्या या रुग्णालयात रात्रीच्या वेळी एकही डॉक्टर थांबत नसल्याने रात्री अचानक उद्भवलेल्या आजारांवर, सर्पदंश, कुत्रा चावल्यानंतर उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे.त्यामुळे रुग्णांच्या नातेवाइकांना आर्थिक भुर्दंड सहन करत पनवेल, नवीमुंबई येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करावे लागले असून त्यात वेळेवर उपचार न मिळाल्याने काही रुग्णांना आपले प्राण गमवावे लागले आहे. तरी कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय सेवा तात्काळ उपलब्ध व्हावी यासाठी उरणचे आमदारांनी जातीने लक्ष घालून रुग्णालयात दोन पुरुष डॉक्टर, परिचारिका यांची २४ रिक्त पदे, दोन सुरक्षारक्षक आणि डॉक्टरांसाठी सोयीसुविधा युक्त रहिवासी संकुल उरण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी रुग्णांचे नातेवाईक करत आहे.

### इंदिरा गांधी रुग्णालयावर ताण

तालुक्यातील गरिब,गरजू रुग्णांच्या उपचारासाठी उरण शहरातील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय आणि कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्र अशी सध्या दोन उपचार केंद्र आहेत. ३० खाटांचे इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयावर अवघ्या तालुक्याचा भार आहे. दररोज २५० बाह्यरुग्णांची वर्दळीमुळे ग्रामीण रुग्णालयावर कामांचा ताण वाढत आहे.

# कर्जतमध्ये कृषी सप्ताह उत्साहात



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंत नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन साजरा करण्यात आला. तसेच १ ते ७ जुलै दरम्यान आयोजित कृषी सप्ताहाचा समापन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी वनस्पती रोग शास्त्रज्ञ डॉ. पुष्पा पाटील, कृषिविद्यावेत्ता डॉ. विजय सागवेकर, कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने, कीटक शास्त्रज्ञ डॉ. वैशाली सावंत, कनिष्ठ भात पैदासकार, डॉ. महेंद्र गवई, कनिष्ठ कृषिविद्यावेत्ता डॉ. नामदेव म्हसकर, कनिष्ठ संशोधन सहायक डॉ. राजेंद्र सावळे, कृषी पर्यवेक्षक महेश घारपुरे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जयंती व कृषि सप्ताहाचे औचित्य साधून कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्र, भात पैदास विभाग, कृषिविद्या प्रक्षेत्र आणि एम. ए. ई. प्रक्षेत्रावर शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विविध वृक्षांचे सामूहिक वृक्षारोपण केले.

सप्ताहाच्या अखेरच्या दिवशी भात पैदास विभागाच्या प्रक्षेत्रावर डॉ. वाघमोडे यांनी नारळ वाढवून पैदासकार कर्जत-५ बीजोत्पादन प्लॉटचे पूजन केले. त्यानंतर उत्साहात लावणी करून कृषी सप्ताहाचे यशस्वी समापन करण्यात आले. यावेळी कृषी विद्यावेत्ता डॉ. विजय सागवेकर, कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने, वनस्पती शरीरक्रिया शास्त्रज्ञ डॉ. मीनाक्षी केळुसकर, कनिष्ठ भात पैदासकार डॉ. महेंद्र गवई, वरिष्ठ संशोधन छात्र अनिरुद्ध मदने उपस्थित होते.



## रोह्यात लावणीच्या कामास प्रारंभ

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील ग्रामीण भागात गेल्या आठ दिवसांपासून भात लागवड सुरु केली आहे.

दमदार पावसामुळे भात लागवडीसाठी रोपांची योग्य वाढ झाल्याने अखेर शेतकरी वर्गाने जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भात लावणीच्या कामास सुरुवात केली आहे. लागवड केलेल्या रोपांना पुढील कालावधीत योग्य प्रमाणात पावसाचे पाणी मिळत असल्याने शेतकरी वर्गाने क्षणाचाही विलंब न लावता आपाल्याला शेती क्षेत्रात भात लावणीच्या कामास दमदार प्रारंभ केला असल्याचे दिसून येते आहे. दरम्यान पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

## राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात वृक्षारोपण

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

माजी उच्च शिक्षण मंत्री व कोकण ज्ञानपीठ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. प्रभाकर नारायण तथा अप्पासाहेब धारकर यांच्या जयंतीनिमित्त कर्जत तालुक्यातील दहिवली भागात असलेल्या कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षरोपण करण्यात आले.

आत्तापर्यंत या परिसरात तीन हजार पेक्षा जास्त वृक्ष संगोपन केले आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी म्हणून प्रत्येक वर्षी एक झाड लावून त्याचे संगोपन केले पाहिजे असे सूचित केले.

याप्रसंगी विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, उपप्राचार्य डॉ. अमोल चांदेकर, निकेत मंडावळे, डॉ. निलोफर खान, डॉ. अतुल त्रिपाठी, डॉ. सतीश पांडव, प्रा. स्वप्नील फलक, प्रा. निलेश भोंडे, प्रा. अक्षता गीध, प्रा. प्रिया खाते, प्रा. अनिकेत इंदुलकर, प्रा. धनश्री शिंदे, विजय जिनघरे, रेवती देशपांडे, रुपेश पाटील, महेश म्हात्रे, प्रवीण पाटील, नवनाथ शेळके, मयूर कडू, सुहास गुप्ते, निशिकांत मोधळे, विकास फिरके, संजय चौधरी, ममता पाटणकर, सुलभा पाटील, पूनम देशमुख, अर्जुन गोरखा, संजय बांदिवडेकर, ईश्वर मिसाळ आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फोटोग्राफर असोसिएशनतर्फे सूचना फलक




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यामध्ये पावसाळ्यात पर्यटकांची गर्दी पाहायला मिळत असते. सह्याद्रीच्या पर्वतरांगेतून वाहणारे धबधबे तसेच माथेरान सारख्या पर्यटन स्थळाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मुंबईवरून कर्जतकडे येत असतात. पण हा आनंद घेत असताना पाण्याचा किंवा धब-धब्याच्या खोलीचा अंदाज नसल्याने पर्यटकांचे जीव जात आहेत. त्यामध्ये सेल्फी आणि रिल्स बनवण्याच्या नादात आपला जीव धोक्यात टाकत आहेत. या सर्व बाबींचा विचार लक्षात घेता नेरळ फोटोग्राफर असोसिएशन आणि नेरळ पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने सामाजिक बांधिलकीच्या हेतुने नेरळ परिसरातील धबधब्यांवर सुचना फलक लावण्यात आले. डोंगरदऱ्या असो वा धबधबे असोत, पावसाळी पर्यटन जेवढं मोहक तेवढंच घातक.

सेल्फी किंवा रिल्समुळे आपला अमुल्य जीव धोक्यात घालू नका. नुसते धाडस टाळा. जीव धोक्यात घालू नका असे जाहीर आवाहन करणारे फलक धबधब्यांवर लावण्यात आले आहेत.

यावेळी नेरळ फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष चेतन केळकर, दिलीप मसणे, मनोज भोईर, यांच्यासह असोसिएशनचे इतर सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्जतमध्ये शालोपयोगी वस्तूंचे वाटप




**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या प्रयत्नातून तसेच अवधूत साठे ट्रेडिंग अकॅडमीच्या सीएसआर निधीतून मुलांना पावसाळी स्पर्धा आणि मैदानी खेळ खेळता यावे म्हणून २० शाळांना क्रीडा गणवेश वाटप करण्यात आले.

तालुक्यातील वेणगाव खुर्द, वेणगाव बुद्रुक, वदप, कुशिवली, जांभिवली, डोणेवाडी, अरवंद, साळोख, बारणे, भोईरवाडी या शाळांना क्रीडा गणवेशाचे वाटप गौरी साठे याच्या हस्ते करण्यात आले होते.

याप्रसंगी कर्जतच्या माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, ज्ञानेश्वर वाडीले, श्रीकृष्ण सुपे, अजय डाळिंबकर, भगवान घरत, माधवी कोसमकर, प्रणिता निकम, संजय देशमुख, थोरात, पाटील, अहिरे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, वनिता चंद्रावले, संदेश भोईर, नागरिक उपस्थित होते.

## अनाथ मुलांसाठी आर्थिक मदत



**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

समाजकार्याची तळमळ बाळगणारे सूर्यकांत खैरे यांनी सेवानिवृत्तीनंतर पुणे येथील आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांची मुले, अनाथ व एकल पालकांच्या मुलांसाठी मोफत निवारा शिक्षण देणाऱ्या स्नेहवन या संस्थेला देणगी देऊन सहकार्य केले आहे. ते गेली २७ वर्षे एपीएमसी मार्केटमध्ये सुरक्षा रक्षक म्हणून सेवा करत होते.

### कृषीदिनी चौल-पाझर डोंगरावर वृक्षलागवड | संस्थापक अध्यक्ष रवींद्र पाटील यांचे प्रतिपादन

# वृक्षारोपणाबरोबर संवर्धन गरजेचे



**। चौल । प्रतिनिधी ।**

**निसर्गाचा समतोल राखता यावा यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. परंतु, नुसते वृक्षारोपण करुन थांबू नका, तर लावलेल्या रोपट्यांचे संवर्धन करुन बहारदार वृक्षात रुपांतर करण्यासाठी मेहनत घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कृषक कल्याणकारी संस्था, चौलचे संस्थापक-अध्यक्ष रवींद्र पाटील यांनी केले.**

अलिबाग तालुका पातळीवर सामाजिक व कृषी क्षेत्रात कार्यरत असलेल्या कृषक कल्याणकारी संस्था, चौल, ज्येष्ठ नागरिक संघ रेवदंडा व निसर्गप्रेमी संस्था, चौल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार (दि.१) जुलै रोजी कृषी दिनाचे औचित्य साधून चौल पाझर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी मार्गदर्शनपर भाषणात श्री. पाटील बोलत होते.

संस्थेमार्फत दरवर्षी कृषी दिनानिमित्त ठिकठिकाणी वृक्षारोपण करण्यात येते. यंदाही स्थानिक वृक्ष करंज, चिंच, खैर, जांभुळ, काजू, आपटा आदी झाडांची लागवड करण्यात आली. ग्लोबल वॉर्मिंगचा वाढता धोका लक्षात घेता पर्यावरणाचा समतोल राखणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन यावेळी कृषक कल्याणकारी संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष रवींद्र गजानन पाटील यांनी केले. ते पुढे म्हणाले की, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी केवळ शासनावर अवलंबून राहू नये. त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने कर्तव्य भावनेतून वृक्षारोपणासारख्या कार्यक्रमात सहभागी होणे गरजेचे आहे. आणि, तरच ग्लोबल वॉर्मिंगच्या वाढत्या धोक्याला आपण रोखू शकतो. पृथ्वीच्या भूगर्भातील पाण्याचा साठा कमी होत चालला आहे. यामुळे भविष्यात पाण्याची गंभीर समस्या निर्माण होणार आहे. पाण्याचे पुनर्भरण करण्यासाठी वृक्षारोपणाचे महत्त्व विशदही त्यांनी केले. कोरोना काळात आपल्याला ऑक्सिजनेच महत्त्व कळले; परंतु तो निर्माण करण्यासाठी वृक्षलागवड आणि त्यांचे संवर्धन करणे, काळाची गरज असल्याचे रवींद्र पाटील यांनी सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक संस्थेचे पदाधिकारी, निसर्गप्रेमी संस्थेचे सदस्य तसेच कृषक कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष प्रमोद पाटील, उपाध्यक्ष दिलीप पाटील, सुधाकर राऊळ, प्रमोद पाटील, प्रकाश पाटील यांनी विशेष प्रयत्न केले. यावेळी छायाचित्रकार सुरेश खडपे, सुशील वर्तक, सिद्धराज पाटील, राजेश थळकर, राकेश काठे, सुशांत शिवलकर, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव प्रकाश पाटील यांनी केले.

> “वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. परंतु, वृक्षलावड ही नुसती दिखाव्यासाठी नको. तर, लावलेले प्रत्येक रोपटे जगवणे ही आपली जबाबदारी आहे. घरातील लहान बाळाची जशी आपण काळजी घेतो, जोपासतो, त्याप्रमाणे लावलेल्या रोपट्याची काळजी घेऊन ते योग्यरितीने वाढविण्यासाठी संगोपन करणे गरजेचे आहे. तरच, उजाड डोंगर हिरवेगार होतील. पर्यावरणाचा समतोल राखता येईल.”
> – रवींद्र पाटील
> संस्थापक-अध्यक्ष, कृषक कल्याणकारी संस्था

# शाळा दुरुस्तीसाठी आठ कोटींचा निधी

**। पनवेल । वार्ताहर ।**

महापालिका कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या ३१ शाळांच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी, धामोळे व बेलपाडा येथील शाळांची पाहणी करून कामाचा आढावा घेतला. पनवेल महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील २९ गावांमधील रायगड जिल्हा परिषदेच्या ५१ शाळांचे हस्तांतर रखडले असले तरी महापालिकेने पुढाकार घेत ३१ शाळांची दुरुस्तीची कामे सुरू केली आहेत. यासाठी सुमारे आठ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

धामोळे येथील शाळेमध्ये पहिली ते सातवीपर्यंत वर्ग भरले जात आहेत. धामोळे येथील शाळेचे दुरुस्तीचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. या ठिकाणी एक मजली शाळेची दुरुस्ती करण्यात आली असून यामध्ये फरशी बदलणे, फॉल सीलिंग करणे, दरवाजे- खिडक्या नव्याने बसविणे, अशी विविध कामे करण्यात आली आहे. तसेच पंखे, दिवे लावून शाळेचे रंगकामही करण्यात आले आहे.बेलपाडा येथे पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग भरले जात असून तळमजल्यावर शाळा भरते. या ठिकाणी फरशी बदलणे, प्लास्टर करणे, फॉल सीलिंग करणे, जाळी बसविण्याची कामे करण्यात आली आहेत. दरवाजे- खिडक्या नव्याने बसविण्यात आल्या आहेत. याबरोबरच पंखे, दिवे बसवून शाळेचे रंगकाम करण्यात आले आहे. या वेळी सेवानिवृत्त अधिकारी विनायक जाने, कनिष्ठ अभियंता कोमल जाधव, स्नेहल लांब, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी उपस्थित होते.

> मोडकळीस आलेल्या ३१ शाळांच्या दुरुस्तीचे काम महापालिकेने सुरू केले आहे. धामोळे व बेलपाडा येथील कामाची पाहणी करून कामाचा आढावा घेण्यात आला. उर्वरित शाळांच्या दुरुस्तीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.
>
> \- गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त, पनवेल महापालिका.



# शिवणसई आंबे शाळेत छत्री वाटप

**। पनवेल। वार्ताहर।**

पावसाळ्याचे दिवस चालू असून अनेक विद्यार्थ्यांचे पावसापासून संरक्षण होण्यासाठी रायगड जिल्हा परिषद शाळा शिवणसई आंबे येथे रिटघर गावचे ॲड.रेश्मा भोपी व गुरुनाथ भोपी यांच्याकडून शिवणसई शाळेत विद्यार्थ्यांना मोफत छत्री वाटप करण्यातआले

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ग्रुप ग्रामपंचायत दुदरेचे सरपंच सुभाष भोपी उपस्थित होते. तसेच भारत भोपी, विश्वास पाटील, ग्रामसेवक अजिनाथ खेडेकर, संतोष पाटील, विजय पाटील, जगदिश पाटील, सुभाष पालकर आदी मंडळी सह शाळेचे मुख्याध्यापिका व शिक्षकवृंद महिला मंडळ शिवणसई आंबे आदी उपस्थित होते.

दिनांक: १०/०७/२०२५

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक जयश्री पंकज म्हात्रे व पंकज अशोक म्हात्रे यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ.स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| नागांव ता.अलिबाग | ४७ | क्षेत्र ०-३९-०० | ७.३८ |

**वर नमुद मिळकतीपैकी जयश्री पंकज म्हात्रे व पंकज अशोक म्हात्रे यांच्या हिश्याचे क्षेत्र ०-०५-११ हे. आर. या बागायत मिळकतीबाबतचे**

दिनांक: १०/०७/२०२५

अशिलांची सही
**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मारेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कांडविरा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतींचे विद्यमान मालक मारूती वसंत पाटील वगैरे, यांच्या मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेल्या मिळकती माझे अशिलांना कायमस्वरूपात विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| कांडविरा ता. अलिबाग जि. रायगड | ३ | ०-४२-२० <br> पो.ख. ०-०२-८० <br> एकूण क्षेत्र ०-४५-०० | ३.५० |
| कांडविरा ता. अलिबाग जि. रायगड | ४/३ | ०-१७-२० <br> पो.ख. ०-०१-३० <br> एकूण क्षेत्र ०-१८-५० | १.५० |
| कांडविरा ता. अलिबाग जि. रायगड | ५/३ | ०-३४-७० <br> पो.ख. ०-०४-०० <br> एकूण क्षेत्र ०-३८-७० | ४.५६ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे गृहीत धरून माझे अशिल वरील मिळकतींच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख : १०/०७/२०२५ सही/-
**ॲड. रिया गणेश पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड
रा.मु. नेहुली, पो. खंडाळे
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९६०७३३१९७५

# पनवेल आरटीओ कार्यालयाविरोधात आंदोलनाचा इशारा

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल आरटीओ कार्यालयामध्ये एडिसीच्या नावाखाली चालणाऱ्या दलालगिरी, लाचखोरी व अनधिकृत व्यक्तींबाबत १५ दिवसांत ठोस कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटाचे पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस शहबाज फारूक पटेल यांनी दिला आहे.

पनवेल आरटीओमध्ये गेल्या काही महिन्यांपासून एडिसीच्या नावाखाली काही अनधिकृत व्यक्ती खुलेआम वावरत आहेत. या दलालांच्या मदतीने ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन कागदपत्र ट्रान्सफर, तपासणी व इतर सेवा या नागरिकांकडून बेकायदेशीररित्या लाच घेऊन पूर्ण केल्या जात आहेत. हा प्रकार केवळ गैरकायदेशीरच नाही, तर हक्कांची पायमल्ली करणारा आहे. त्यामुळे एडिसीच्या नावाखाली वावरणाऱ्या सर्व अनधिकृत व्यक्तींना त्वरित हद्दपार करावे, संबंधित अधिकाऱ्यांविरोधात विभागीय चौकशी करून कठोर कारवाई करावी, तसेच मागील ३ महिन्यांचे सीसीटीव्ही फुटेज सार्वजनिक करून दोषींचा पर्दाफाश करावा अशी मागणी शहबाज फारूक पटेल यांनी केली आहे.

## अलिबाग नगर परिषद ता.अलिबाग जि.रायगड
### ई-निविदा सुचना क्रमांक (०१)
### सन २०२५-२६ (पहिली वेळ)

अलिबाग नगर परिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद यांचेकडुन वीज विभाग अंतर्गत योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ब-१ नमुण्यातील निविदा पहिल्यांदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागवित आहेत.

टिप:- वरील निविदेमध्ये (०१) कामे समाविष्ट असुन कामाची संपुर्ण माहिती खालील प्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

https://www.mahatenders.gov.in

दिनांक : १०/०७/२०२५

स्वा/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद जि. रायगड**

## -: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यांत येते की, :-

मौने सुरई, ता.मुरुड, जिल्हा रायगड येथील खालीलप्रमाणे हक्क नोटीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी संबंधित कब्जेदार १) यास्मीन अताऊल्ला घये, २) झैनब अताऊल्ला घये, ३) हबीब अताऊल्ला घये, ४) मोमिना अताऊल्ला घये, ५) मुहिबुल्ला अताऊल्ला घये यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| गट नं. | खाते नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. | पिके | गांव |
|---|---|---|---|---|---|
| १२/१ पैकी | १६२ | ला.ला.३-१७-७४ <br> पो.ख.०-७३-६० <br> एकूण ३-९१-३४ | ३-९६ | नारळ | सुरई, ता.मुरुड |

वरील वर्णनाच्या संपूर्ण क्षेत्राच्या जमीन मिळकतींपैकी आमचे अशिल क्षेत्र ०.२०.०० हे.आर.पॉ. जमीन मिळकत खरेदी करणार आहेत.

सबब सदर वरील वर्णनाच्या जमीन मिळकतींपैकी संबंधीत कब्जेदार यांचे मालकी, हिश्श्याची एकूण क्षेत्र ३-९१-३४ हे. आर. पॉ. या जमीन मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात, याप्रमाणे कोणाचीही, कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजाविरहित व खरेदी घेण्यास योग्य आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत, असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण :- मुरुड-जंजिरा. सही /-
दिनांक : ०९/०७/२०२५
**अन्वर ए. हुसेन**
ॲडव्होकेट
रा. एस.टी.डेपो जवळ, दत्तमंदिर रोड,
मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| कालवडखार ता.अलिबाग, जि.रायगड | १५ | ००.६८.८० | ९.०६ |

वर वर्णन केलेली मिळकत आमचे आशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक एकनाथ बाळाराम म्हात्रे यांच्या सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध ताबाकब्जा भाडेट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य दस्त कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी हया नोटीसीच्या तारखेपासून ०८ दिवसाच्या आत प्रथमदर्शनी पुरव्यासह त्यांच्या लेखी हरकती दाखल कराव्यात याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतेही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे. असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भात नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्यानंतर येण्याच्या कोणत्याही हरकतीस माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबधीतांनी नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ०७/०७/२०२५
**ॲड. अमर अशोक घरत**
मु. पो.थळ, पेठ नाका,
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना व वित्तीय संस्थाना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा रायगड तालुका अलिबाग यांचे कार्यक्षेत्रातील तलाठी सजा मिळकत, गाव कोळगांव येथील गट नं.१७६ ही शेत जमिन मिळकत जागा मालक यांचे खुद्द मालकी, ताबा, कब्जा, वहीवाटीच्या आहे. जागा मालक यांचे मालकी हिस्स्याचे क्षेत्र हे. हे. ०.०६.०० आर.चौ.मी, व पोट खराब हे. ०.०१.८०.आर.चौ.मी, मिळकत यासी एकूण आकारणी रु.१.७५ पै. असे एकूण क्षेत्र हे. ०.७.८०. आर. चौ मी. ही शेतजमीन मिळकती यांसी चतु:सिमा पूर्वेस गट क्र.१७७ मधील विनय घरत यांची शेत मिळकत, पश्चिमेस- गट क्र.१७५ मधील सदाशिव नाईक यांची शेत मिळकत, दक्षिणेस गट क्र.१७४ मधील जर्नादन वामन घरत यांची शेत मिळकत, उत्तरेस गट क्र.१८२ मधील अशोक काटे यांची शेत मिळकत, यांसी चतु: सीमा येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही जागा मालक यांची कायदेशीर मालकी व कब्जेवहिवाटीची असून सदरची मिळकत आमचे अशिल मुळ मालकांकडून खरेदी घेणार आहेत. तसे मूळ मालक आमचे अशिलांमध्ये बोलणी होऊन मुळ मालकांनी आमचे अशिलांकडून संचकारादाखल रक्कम स्वीकरलेली आहे. सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा वर नमूद मिळकत मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे. तथापी सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, अग्रहक्क, विक्री, गहाणपत्र, भाडेकरारत्र, अभिहस्तांकन, न्यास, देणगी, लिअन, हवाला, ताबा, सुविधाधिकार, वारसाहक्क, याद्वारे किंवा अन्यथा कशाही प्रकारे उक्त मालमत्तेत किंवा त्यावर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हक्क, हितसंबंध, दावा, किंवा मागणी असणाऱ्या सर्व व्यक्तींना तो लेखी स्वरूपात संबंधित कागदपत्रांसहित जे नोटराईज्ड करून साक्षांकित केलेले असतील त्यांनी आम्हांस स्वालील पत्त्यावर आजच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ दिवसांत कळविण्याची विनंती करण्यात येते, अन्यथा सदर मुदतीनंतर सदरची मिळकत निष्कर्जी व निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदरची मिळकत सदर मालकांकडून कायमखुष रजिस्टर खरेदीपत्र पूर्ण करून घेतील व त्यानंतर कोणचीही कसलीही तक्रार/हरकत आमचे अशिलांचेवर सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस

दिनांक
**चैतन्य सुनिल खंदारे**
ॲडव्होकेट
ऑफिस-१३१७ दलामाल टॉवर,
फ्री, प्रेस मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग
### निविदा सूचना

बँकेच्या ६० शाखांमधील सिक्युरिटी अलार्म सिस्टीम सर्व्हिसिंग करणेच्या आहेत. तरी या क्षेत्रांतील अनुभवी/ इंजिनिअर सहकारी संस्था यांचेकडून निविदा मागविणेंत येत आहेत. वरील सिक्युरिटी अलार्म सिस्टीम सर्व्हिसिंगच्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक १०/०७/२०२५ ते १७/०७/२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नांवाने सादर कराव्यांत. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेंत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा अगर निविदेमधील कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग सही/-
दिनांक : ०९/०७/२०२५ **उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

## तहसिलदार अलिबाग यांचे न्यायालयात

कु.का.क.७० व दावा क्र.०८/२०२४

श्री. चंद्रकांत विठ्ठल देखमुख,
रा.आनंदवाडी, पो.कुर्डुस, अर्जदार
ता.अलिबाग, जि.रायगड

विरुद्ध

१. श्री.कल्याणराज हिंमतमल सोळंकी,
२. श्री.रमेशकुमार सागरमल सोळंकी, सामनेवाला
रा.कुर्डुस, ता.अलिबाग, जि.रायगड

**मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ७० व अन्वये दावा मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | गट नं. | क्षेत्र | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|
| बिडवागळे | १०० | ०-१२-२० | ०-०२-५० | ०.३४ |

अर्जदार व सामनेवाला यांस कळविणेत येते की, वरील निर्दिष्ट केलेल्या जमिनीबद्दल अर्जदार यांनी कुळ कायदा कलम ७०ब प्रमाणे दावा दाखल केला आहे. त्या अनुषंगाने सदर प्रकरणाची सुनावणी दि.१५/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे सुनावणी करणेचे ठरविले आहे. सबब, तुम्ही अगर तुमचे प्रतिनिधी यांनी सर्व कागदपत्रांसह व साक्षीपुराव्यानिशी म्हणणे घेऊन तहसिल कार्यालय अलिबाग यांचे कोर्टात हजर रहावे. वरीलप्रमाणे तुम्ही स्वतः अगर तुमचे प्रतिनिधीमार्फत सर्व साक्षी पुरावे व कागदपत्रांसह सदर ठिकाणी व वेळी हजर न राहिल्यास सदर दाव्याची सुनावणी तुमचे गैरहजेरीत घेण्यात येऊन गुणवत्तेनुसार निकाल दिला जाईल, यांची नोंद घ्यावी.

ठिकाण:- अलिबाग सही/-
दिनांक:- ०९/०७/२०२५ **तहसिलदार अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, १) श्री.बळवंत गजानन साठे रा.मधली आळी तळा ता.तळा, जि.रायगड २) सौ.वसुधा शशिकांत साठे रा.विठ्ठल रखुमाई मंदिराच्या मागे ब्राम्हणआळी तळा, ता.तळा, जि.रायगड ३) श्री.रविंद्र शशिकांत साठे रा.मधलीआळी तळा ता.तळा, जि.रायगड ४) सौ.मनिषा महेश मोघे पूर्वाश्रमिची मनिषा शशिकांत साठे रा.रूम नं. डी/३०४, वृंदावन कॉम्पलेक्स गंगेश्वर टॉवर जवळ, गणेश नगर डोंबीवली वेस्ट, कल्याण विष्णुनगर ठाणे ४२१२०२ यांचे मालकीची, ताबेकब्जातील व वहीवाटीतील खालील वर्णनाची मिळकती, आमचे आशिलांनी त्यांचेकडून कायम खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौने किस्तकेतके, ता. तळा जि. रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र. हे. आर. पॉ. | आकार रू. पै |
|---|---|---|
| १२/१ | १-२९-०० <br> पो.ख. ०-७६-३० <br> २-०५-३० | ०.५१ |
| १२/३ | ०-७५-०० <br> पो.ख. ०-११-०० <br> ०-८६-०० | ०.२५ |
| १२/९ | ०-०४-०० <br> पो.ख. ०-०३-०० <br> ०-०७-०० | ०.०३ |
| १३/२ | ८-२४-०० <br> पो.ख. ०-६४-०० <br> ८-८८-०० | ४.०६ |
| | **एकूण क्षेत्र ११-८६-३०** | |

येणेप्रमाणे, वर्णनाच्या, जमिनीमध्ये, कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, मालकी हक्क, हितसंबंध, कुळवहिवाट, ताबाकब्जा, गहाण, दान, बक्षीसपत्र, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, एकविस (२१) दिवसांच्या आत त्यांची हरकत कागदोपत्री पुराव्यासहीत, खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध, विनाहरकत व बोजारहित आहे असे समजून आमचे आशिल सदर जमिनीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती, आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

पनवेल सही /-
दिनांक - /०७/२०२५
**ॲड. पी. जी. दाभाडे**
रा. साई नगरी हौ. सोसायटी प्लॅट नं.४०२,
चौथा मजला बी विंग, डॉ.वागले हॉस्पिटल जवळ,
छत्रपती शिवाजी नगर रोहा, ता.रोहा, जि.रायगड.
मो.नं. ९२७२७१३९५६

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

### रोजगार अधिसूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, केआरसीएल मार्गावरील रोहा (महाराष्ट्र) आणि ठोकूर (कर्नाटक) दरम्यान केआरसीएल प्रकल्पासाठी ज्यांची जमीन संपादित करण्यात आली आहे अशा पात्र भूमिहीन उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागवत आहे.

**रोजगार सूचना: सीओ/पी-आर /04/2025- ट्रॅक मेंटेनर आणि पॉइंट्समन या पूर्वीच्या ग्रुप "डी" पदासाठी भरती**

| क्र. सं. | पूर्वीच्या ग्रेड डी पदाचे नाव | 7वी सीपीसी पीएमएल | मेडिकल श्रेणी | यूआर | ईडब्ल्यूएस | एस सी | एस टी | एकूण | भूतपूर्व सैनिक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ट्रॅक मेंटेनर | पीएमएल -1 | ए-3 | 23 | 4 | 5 | 3 | 35 | 7 |
| 2 | पॉइंट्स मॅन | पीएमएल -1 | ए-2 | 29 | 6 | 7 | 2 | 44 | 9 |

उमेदवारांना सविस्तर सूचना, पात्रता निकष केआरसीएल वेबसाइट www.konkanrailway.com वर लिंक → भरती → वर्तमान अधिसूचना या वर पाहता येतील आणि त्यानुसार अर्ज करू शकतात.

**मुख्य कार्मिक अधिकारी**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, १) श्री. विजय गजानन साठे रा. ब्राम्हणआळी तळा ता.तळा, जि. रायगड २) श्री. प्रकाश गजानन साठे रा. शिवाजी वसाहत वरसे, ता.रोहा, जि.रायगड ३) श्री. बळवंत गजानन साठे रा.मधलीआळी तळा ता.तळा, जि.रायगड ४) सौ. वसुधा शशिकांत साठे रा.विठ्ठल रखुमाई मंदिराच्या मागे ब्राम्हणआळी तळा, ता.तळा, जि. रायगड ५) श्री. रविंद्र शशिकांत साठे रा.मधलीआळी तळा, ता.तळा, जि.रायगड ६) सौ. मनिषा महेश मोघे पूर्वाश्रमिची मनिषा शशिकांत साठे रा.रूम नं.डी/३०४, वृंदावन कॉम्पलेक्स गंगेश्वर टॉवर जवळ, गणेश नगर डोंबीवली वेस्ट, कल्याण विष्णुनगर ठाणे ४२१२०२ यांचे मालकीची, ताबेकब्जातील व वहीवाटीतील खालील वर्णनाची मिळकत, आमचे आशिलांनी त्यांचेकडून कायम खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे किस्तकेतके, ता.तळा जि.रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र. हे. आर. पॉ. | आकार रू.पै |
|---|---|---|
| १३/३/अ/२ | १-६५-०० | ०.३४ |

येणेप्रमाणे, वर्णनाच्या जमिनीमध्ये, कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, मालकी हक्क, हितसंबंध, कुळवहिवाट, ताबाकब्जा, गहाण, दान, बक्षीसपत्र, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, एकविरा(२१) दिवसांच्या आत, त्यांची हरकत कागदोपत्री पुराव्यासहीत, खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध, विनाहरकत व बोजारहित आहे, असे समजून आमचे आशिल सदर जमिनीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती, आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

पनवेल सही /-
दिनांक : /०७/२०२५
**ॲड. पी.जी. दाभाडे**
रा.साई नगरी हौ. सोसायटी प्लॅट नं.४०२,
चौथा मजला बी विंग, डॉ.वागले हॉस्पिटल जवळ,
छत्रपती शिवाजी नगर रोहा, ता.रोहा, जि.रायगड.
मो.नं. ९२७२७१३९५६

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत या मिळकतीचे विद्यमान मालक निसार अब्दुल रहिमान शेख, नदिम नुर अन्सारी, नईम नुर अन्सारी सर्व रा.मु.पो.आवास ता.अलिबाग यांचेकडुन कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी बोलणी केली आहेत.

**मिळकतीचे वर्णन :-**

| अ. क्र. | मौजे | सिटी सर्व्हे नं. | क्षेत्र चौ.मी. | सत्ताप्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | आवास | ७६१ | ३८१.३० पैकी १९०.६५ | क |
| २ | आवास | ७५९ | २८.८० | क |

सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहित असुन या मिळकतीवरील आपली मालकी अबाधित आहे, तसेच सदरची मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा निसार अब्दुल रहिमान शेख, नदिम नुर अन्सारी, नईम नुर अन्सारी हे माझे सोबत करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणुन द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहुन आलेली अशी कोणतीही कसलीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

हे सर्वांस कळविले.

अलिबाग स्वाक्षरीत /-
दिनांक ०९/०७/२०२५
**ॲड. जयंत ह. चेऊलकर**
२०१, सृष्टी दुसरा मजला
चुंबकीय वेधशाळेसमोर अलिबाग

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पिंपळपाडा, ता.कर्जत, जि.रायगड, येथील बिनशेती मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १२/१/अ/७० | ६.६८.०० | ६६.८० | श्रीमती वर्षा हरिश्चंद्र चव्हाण, वैगेरे. |

वरील वर्णनाच्या बिनशेती जमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या २१(एकवीस) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत सही /-
दिनांक :- १०/०७/२०२५.
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे .
मो.नं.७३८५००४८०६.

जा.क्र.नोंदणी शाखा /१४०१/२५
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरु इमारत, पोस्ट ऑफिसजवळ,
अलिबाग, जि.रायगड दि.९/०७/२०२५

**चौकशीची जाहीर नोटीस**
**नियम ७ अ प्रमाणे**

अर्ज क्रमांक :- २८०/२०२५

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- GLOBAL CANCER CONSORTIUM SOUTH ASIA CHAPTER ...बाबत.

Dr. Prasanna Venkatraman ..... अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेला नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्दयांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
(२)खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत : (वर्णन) रोख रक्कम १,०००/- रुपये
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहिनिशी व मी सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०९.०७.२०१५ रोजी दिली.

सही/-
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**

# लॉर्ड्सवर शुबमनची कसोटी

## ● १५ पैकी १२ भारतीय कर्णधार फेल!; चमत्कार घडविण्यासाठी भारत सज्ज

**। लॉर्ड्स । वृत्तसंस्था ।**

लॉर्ड्सला क्रिकेटची पंढरी म्हटलं जातं. त्यामुळे या मैदानात विजय मिळवणं हे प्रत्येक कर्णधाराचं स्वप्न असतं. लीड्स कसोटी सामना गमावल्यानंतर एजबेस्टनमध्ये भारताने कमबॅक केलं. पण तिसरा कसोटी सामना वाटतो तितका सोपा नसेल. आतापर्यंत भारताचे १५ कर्णधार आपल्या संघासह लॉर्ड्स मैदानात उतरले आहेत. यात १२ जणांच्या पदरी निराशा, तर तीन कर्णधारांना यश मिळालं आहे. शुबमन गिल हा लॉर्ड्सवर कसोटी सामना खेळणारा १६वा कर्णधार आहे. त्यामुळे त्याच्यापुढे मोठं चॅलेंज आहे.



शुबमन गिल लॉर्ड्सवर विजय मिळवणाऱ्या तीन कर्णधारांच्या यादीत समाविष्ट होईल का? सर्वात आधी लॉर्ड्सवर टीम इंडियाची कामगिरी कशी आहे? याबाबत अभ्यास करणं आवश्यक आहे. भारतीय १९३२ पासून लॉर्ड्सवर कसोटी क्रिकेट खेळत आहे. आतापर्यंत या मैदानात १९ सामने खेळले असून तीनमध्ये विजय मिळवला आहे. तर १२ सामन्यात पराभवाचं तोंड पाहावं लागलं आहे. तर चार सामने ड्रॉ झाले आहेत.

टीम इंडियाने लॉर्ड्सवर तीन कसोटी सामने जिंकले आहेत. यात कपिल देव, एमएस धोनी आणि विराट कोहली कर्णधार होते. कपिल देवच्या नेतृत्वात १९८६ मध्ये भारताने पहिल्यांदा कसोटी जिंकली होती. त्यानंतर दुसरा कसोटी सामना २८ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधींतर महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वात २०१४ मध्ये जिंकला. त्यानंतर सात वर्षांनी म्हणजेच २०२१ मध्ये विराट कोहलीच्या नेतृत्वात भारताने लॉर्ड्सवर विजयी पताका रोवली होती. आता शुबमन गिलच्या नेतृत्वात अशी कामगिरी करणं शक्य आहे का? एकंदरीत आकडेवारी पाहिली तर आकडे भारताच्या विरूद्ध आहेत. त्यामुळे शुबमन गिलच्या नेतृत्वात एजबेस्टन कसोटीसारखा चमत्कार घडेल का? यासाठी टीम इंडियाकडे लक्ष लागून आहे.

भारताने आतापर्यंत खेळलेल्या १९ सामन्यापैकी ९ सामन्यात टॉस जिंकला आहे. तर १० सामन्यात टॉस गमावला आहे. ९ कसोटी सामन्यात प्रथम फलंदाजी केली होती. यापैकी २ सामने जिंकले, तर सहा सामन्यात पराभवाचं तोंड पाहिलं. तर एक सामना ड्रॉ झाला. १० कसोटी सामन्यात टीम इंडियाने प्रथम गोलंदाजी केली. त्यात फक्त एक सामना जिंकला. तर सहा सामने गमावले आहेत. तर तीन सामने ड्रॉ करण्यात यश मिळालं आहे.

इंग्लंडने भारताविरुद्धच्या आगामी तिसऱ्या सामन्यासाठी प्लेइंग इलेव्हनची घोषणा केली आहे. इंग्लंडने संघाने गुरुवारी लॉर्ड्सवर सुरू होणाऱ्या भारताविरुद्धच्या तिसऱ्या कसोटीसाठी त्यांच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये एक बदल केला आहे. संघाचा वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर चार वर्षांनी परतला आहे. जोश टँगच्या जागी जोफ्रा आर्चरचा संघात समावेश करण्यात आला आहे. फेब्रुवारी २०२१ नंतर आर्चरचा हा पहिलाच कसोटी सामना असणार आहे.

कोपराच्या आणि पाठीच्या दुखापतीतून बरा झाल्यानंतर आर्चर कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्यास सज्ज झाला आहे. त्याने फेब्रुवारी २०२१ मध्ये शेवटची कसोटी खेळली होती. मालिकेच्या पहिल्या सामन्यात पाच विकेट्सने विजय मिळवल्यानंतर, एजबॅस्टन येथे झालेल्या दुसऱ्या कसोटीत यजमान संघाला ३३६ धावांनी पराभव पत्करावा लागला. यासह, भारताने पाच सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली.

या सामन्यासाठी भारतीय संघाचा प्लेइंग इलेव्हन कोणता असेल हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. परंतु भारतीय संघातही किमान एक बदल दिसून येईल अशी अपेक्षा आहे. लॉर्ड्सची खेळपट्टी वेगवान गोलंदाजांसाठी उपयुक्त ठरेल असे मानले जात आहे, त्यामुळे जसप्रीत बुमराह पुनरागमन करताना दिसेल, त्याच्या जागी प्रसिद्धला बाहेर जावे लागू शकते. तथापि, भारतीय कर्णधार शुबमन गिल नाणेफेकीच्या वेळी संघाचे प्लेइंग इलेव्हन जाहीर करेल.

### तिसऱ्या कसोटीत पाऊस ठरणार व्हिलन?

**इंग्लंडमध्ये पाऊस सर्वात महत्वाचा घटक ठरतो आणि त्यामध्ये जर सामना लॉर्ड्सच्या मैदानात असेल, तर त्याचे महत्व जास्तच वाढते. कारण एकतर लॉर्ड्सची खेळपट्टी वेगवान गोलंदाजांसाठी मदत करणारी असते. पण जर पाऊस पडला तर ती खेळपट्टी फलंदाजांसाठी अधिक घातक ठरू शकते. लॉर्ड्समध्ये पहिल्या दिवशी हवामान मुख्यतः स्वच्छ राहील. पहिला दिवस खूप उष्ण असेल. या दिवशी कमाल तापमान ३० अंश सेल्सियस आणि किमान तापमान १७ अंश सेल्सियस राहील.सामन्याच्या दुसऱ्या दिवशीही हवामान खूप उष्ण असेल. या दिवशी किमान तापमान १७ अंश सेल्सियस आणि कमाल तापमान ३० अंश सेल्सियस राहील. पावसाची शक्यता फक्त एक टक्का आहे. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी सूर्यप्रकाश आणि ढग आकाशात असतील. पण तिसरा दिवसही खूप उष्ण असेल. या दिवशी किमान तापमान १७ अंश सेल्सियस आणि कमाल तापमान ३० अंश सेल्सियस राहील. तिसऱ्या साम न्याच्या चौथ्या दिवशीही खूप गर्मी राहील. आकाशात थोडेफार ढग असतील. या दिवशी कमाल तापमान ३० अंश सेल्सियस आणि किमान तापमान १८ अंश सेल्सियस राहील. सामन्याच्या पाचव्या आणि शेवटच्या दिवशीही बाकी दिवसांप्रमाणेच हवामान खूप उष्ण राहील. या दिवशीही कमाल तापमान ३० अंश सेल्सियस असेल. तर किमान तापमान १९ अंश सेल्सियस असेल.**

# रायगडच्या दिनेश पवार यांना आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक

**। हिमजी । वृत्तसंस्था ।**

जपान हिमजी येथे सुरू असलेल्या एशियन आफ्रिकन पॅसिफिक पॉवरलिफ्टिंग आणि बेंचप्रेस चॅम्पियनशिप स्पर्धेत मास्टर्स बेंचप्रेस क्लासिक स्पर्धेमध्ये चाळीस वर्षावरील स्पर्धेत७४ किलो वजनी गटात रायगडचे खेळाडू दिनेश पवार यांनी सुवर्णपदक प्राप्त केले आहे. त्यांनी एकूण १४२.५ वजन घेतले. यापूर्वी सुद्धा बेंचप्रेस या प्रकारात २०२३(हाँगकाँग)२०२४(साऊथ आफ्रिका) या ठिकाणी झालेल्या स्पर्धेत त्यांनी आंतरराष्ट्रीय पदके पटकावले आहे.



आपल्या यशाचे श्रेय आई गीता पवार आणि पत्नी रेशमा पवार यांच्या प्रोत्साहनाला दिले आहे. दिनेश पवार हे स्पार्टन जिम खालापूर आणि जीत फिटनेस (घोडवली) खालापूर येथे सराव करतात. दिनेश पवार यांच्या यशाबाबत महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त जनरल सेक्रेटरी संजय प्रतापराव सरदेसाई यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# दीप्ती शर्मा पाकच्या छोरीला देताहे तगडी फाईट

## पहिल्यांदाच नंबर वनचा ताज मिरवण्याची संधी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला संघातील अनुभवी अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्मा सध्या इंग्लंड दौऱ्यात आपल्या फिरकीची जादू दाखवून देत आहे. इंग्लंडविरुद्धच्या टी-२०मालिकेतील कामगिरीच्या जोरावर महिला टी-२० क्रमवारीत गोलंदाजांच्या गटात तिने कारकिर्दीतील सर्वोत्तम रँकिंगसह दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

आयसीसीच्या क्रमवारीत महिलांच्या गोलंदाजी गटात पाकिस्तानची सादिया इक्बाल अव्वलस्थानावर आहे. तिच्या खात्यात ७४६ रेटिंग पॉइंट्स आहेत.



दीप्ती शर्मानं आपल्या खात्यात ४३८ रेटिंग पॉइंट्स जमा करत दुसऱ्या स्थानावर झेप घेताना ऑस्ट्रेलियन ॲनाबेल सदरलँड हिला मागे टाकले. इंग्लंड विरुद्धच्या उर्वरित दोन सामन्यात सर्वोत्तम कामगिरीसह दीप्ती नंबर वनच्या स्थानावर पोहचू शकते. इंग्लंडविरुद्धच्या पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेत अरुंधती रेड्डीनंही चांगली कामगिरी करून दाखवली आहे. इंग्लंड महिला संघाविरुद्ध ओव्हलच्या मैदानातील तिसऱ्या सामन्यात ३ विकेट्स घेत तिने ११ स्थानांनी उंच उडी मारली. टी-२० क्रमवारीत ती ४३ व्या क्रमांकावर आहे. दीप्तीशिवाय २० रँकिंगमध्ये रेणुका सिंह ठाकूर ७०६ रेटिंग पॉइंट्ससह सहाव्या स्थानावर आहे. दीप्ती या स्पर्धेतून माघार घेतल्यामुळेही आहे चर्चेत दीप्तीने वर्कलोड मॅनेजमेंटसाठी इंग्लंडमधील द हंड्रेड महिला स्पर्धेतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे.

# शुबमन गिलसह आकाशदीपची उंच उंडी!

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यानंतर आयसीसीने जाहीर केलेल्या नव्या कसोटी क्रमवारीत मोठे बदल झाल्याचे पाहायला मिळत आहे. इंग्लंडचा स्टार बॅटर जो रूट याने आपले अव्वलस्थान गमावले असून दुसरीकडे भारतीय कसोटी संघाचा नवा कर्णधार शुबमन गिलनं क्रमवारीत मोठी झेप घेतली आहे.

आयसीसीच्या नव्या कसोटी क्रमवारीत, जो रुटला त्याच्या संघातील सहकारी हॅरी ब्रूकनं मागे टाकले आहे. टीम इंडियाविरुद्धच्या मालिकेत हॅरी ब्रूकनं आपल्या फलंदाजीतील धमक दाखवून दिली. याचा त्याला क्रमवारीत मोठा फायदा झाला असून ८८६ रेटिंग पॉइंट्ससह तो आता कसोटीतील नंबर वन बॅटर ठरलाय. जो रुट ८६८ रेटिंगसह क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर आहे.



कसोटी क्रमवारीत फलंदाजीमध्ये न्यूझीलंडचा बॅटर केन विल्यमसन ८६७ रेटिंगसह तिसऱ्या स्थानावर कायम असून त्यापाठोपाठ यशस्वी जैस्वाल ८५८ रेटिंग पॉइंट्स मिळवत चौथ्या स्थानावर असून स्टीव्ह स्मिथ ८१३ पॉइंट्ससह पाचव्या क्रमांकावर आहे. भारतीय संघाचा कर्णधार शुबमन गिल इंग्लंडच्या दौऱ्यात सातत्यपूर्ण कामगिरी करताना दिसतोय. दोन शतकांसह

### ■ जो रूटनं गमावला नंबर वनचा ताज

एका द्विशतकाच्या जोरावर भारतीय कर्णधार १५ स्थानांनी मोठी झेप घेत सहाव्या क्रमांकावर पोहचलाय. त्याच्या खात्यात सध्या ८०७ रेटिंग पॉइंट्स जमा आहेत.

बर्मिंगहॅमच्या एजबॅस्टन कसोटी सामन्यात जसप्रीत बमराहच्या जागी खेळताना आकाश दीपनं आपल्या गोलंदाजीतील धमक दाखवून दिली. दुसऱ्या कसोटी सामन्यात १० विकेट्स घेत त्याने भारतीय संघाच्या ऐतिहासिक विजयात मोलाचा वाटा उचलला होता. क्रमवारीतही त्याला या कामगिरीचा फायदा झाला आहे.

# आरजे महवाश झाली क्रिकेट संघाची मालकीण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेटपटू युझवेंद्र चहलचे नाव रेडिओ जॉकी आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसर आरजे महवाशशी बऱ्याच काळापासून जोडले गेले आहे. पंजाब किंग्जकडून खेळणाऱ्या चहलला पाठिंबा देण्यासाठी आरजे महवाश अनेक सामन्यांमध्ये स्टेडियममध्ये आली होती. आता आरजे महवाश एका क्रिकेट संघाची मालकीण बनली आहे.



महवशने चॅम्पियन्स लीग टी२० स्पर्धेत एका संघात हिस्सा खरेदी केला आहे. ती सह-मालकीण बनली आहे. क्रिकेट लीगमध्ये गुंतवणूक करण्याची ही पहिलीच वेळ आहे. तिने लीगच्या अधिकृत पेजवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये ही माहिती दिली. तथापि, तिच्या संघाचे नाव अद्याप देण्यात आलेले नाही.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झालेले अनेक मोठे खेळाडू चॅम्पियन्स लीग टी मध्ये सहभागी होतील. यासोबतच अनेक तरुण खेळाडू देखील त्यात खेळताना दिसतील. ही लीग २२ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट दरम्यान एकूण ८ संघांमध्ये होणार आहे.

युझवेंद्र चहलची कथित प्रेयसी आरजे महवश ही रेडिओ जॉकी आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसर आहे. ती कंटेंट क्रिएटर देखील आहे.

## जे.जे. पाटील यांना श्रमयोगी कार्यकर्ता पुरस्कार | पांडवादेवी येथे १५ जुलैला कबड्डी दिनाचे आयोजन

# महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे पुरस्कार जाहीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. च्या विद्यमाने प्रतिवर्षी कबड्डी महर्षी स्व. बुवा साळवी यांचा १५ जुलै हा जन्मदिन कबड्डी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी रायगड जिल्हा कबड्डी असो. च्या विद्यमाने हा २५ वा कबड्डी दिन जय मंगल कार्यालय, पांडवा देवी, येथे साजरा करण्यात येणार आहे.

रामभाऊ घोडके यांना कबड्डी महर्षी स्व. शंकरराव (बुवा) साळवी कबड्डी जीवन गौरव, जया शेट्टी, खा. नरेश म्हस्के यांना कृतज्ञता, जे.जे.पाटील, प्रभाकर लकेश्री यांना रमेश देवाडीकर श्रमयोगी कार्यकर्ता, तर संकेत सावंत, मंदिरा कोमकर यांना स्व. मधुसूदन पाटील व स्व. अरुणा साटम पुरस्कार राज्य कबड्डी संघटनेच्यावतीने आज जाहीर करण्यात आले.







यंदाचे क्रीडा पत्रकार पुरस्कार मुंबई दै. पुढारीचे सुनील सपकाळ व पुणे दै. सामनाचे विठ्ठल देवकाते यांना जाहीर झाले. ज्येष्ठ खेळाडू म्हणून जीवन पैलकर (मुं. शहर), ज्ञानेश्वर कुंभार (उपनगर), रवींद्र निळकंठ देसाई (ठाणे), नामदेव राठोड (हिंगोली), कुमुद कागलकर - परांडेकर (सांगली), भास्कर सूर्यवंशी (लातूर), चंद्रकांत काटे (पुणे), नलिनी खेडेकर - पवार(पुणे), दिलीप देवलकर (मुं. शहर) यांना, तर ज्येष्ठ कार्यकर्ता म्हणून मंगेश गुरव (उपनगर), मंगेश मोरे (रत्नागिरी), प्रा. चंद्रकांत सातपुते (परभणी), प्रवीण दळवी(ठाणे), प्रकाश पवार(पुणे), तसेच ज्येष्ठ पंच म्हणून प्रकाश चव्हाण (मुं. शहर), सुरेश जोशी (ठाणे), श्रीकांत चतुर (जळगांव), बळीराम सातपुते (अहमदनगर), नवनाथ भालेराव (परभणी), पद्माकर मदन (उपनगर) यांना जाहीर झाले.

स्व.मल्हारपंत बावचकर पुरस्कार प्रत्येकी रोख रू. पाच हजार, पुण्याच्या अजित चौहान व रत्नागिरीच्या समरीन बुरोंडकर यांना देण्यात आला. राज्य अजिंक्यपद स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणारा जिल्हा म्हणून पुणे जिल्ह्याला गौरविण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व अमृत कलश असे पुरस्काराचे स्वरूप राहील. मधुसूदन पाटील व अरुणा साटम पुरस्कारा सोबत प्रत्येकी रोख रुपये दहा हजार देण्यात येतील. स्व. बाबाजी जामसंडेकर, स्व. मुकुंद (अण्णा) जाधव व कबड्डी महर्षी स्व. शंकरराव साळवी यांच्या स्मरणार्थ कुमार/ कुमारी, किशोर/किशोरी गटातील ३-३ खेळाडूना प्रत्येकी रोख पाच हजार शिष्यवृत्ती देण्यात येईल. किशोर गटामध्ये तुकाराम दिवटे, किशोर जगताप, सारंग उंडे, किशोरी गटामध्ये बिदिशा सोनार, सेरेना म्हसकर, यशश्री इंगोले, कुमार गटामध्ये आफताब मन्सूरी, अनुज गावडे, समर्थ देशमुख, कुम ारी गटामध्ये वैभवी जाधव, वैष्णवी काळे, भूमिका गोरे, त्याच बरोबर स्व. जगन्नाथ चव्हाण शिष्यवृत्ती रोख रू. दोन हजार पाचशं किशोर गटामध्ये मनीष काळजे, किशोरी गटामध्ये सेजल काकडे याच बरोबर कबड्डी क्षेत्रात महाराष्ट्र शासनाचा जीवन गौरव मिळालेल्या शकुंतला खटावकर, शिवछत्रपती पुरस्कार मिळालेल्या पंकज मोहिते, विराज लांडगे, असलम इनामदार, आकाश शिंदे, शंकर गदई, अंकिता जगताप, पूजा यादव यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

## निवडक

### स्मृती मंधानाला मिळाला गुलाब

**नवी दिल्ली :** भारतीय महिला क्रिकेट संघ इंग्लंड दौऱ्यावर आहे. या दोन्ही संघांमध्ये पाच सामन्यांची टी २० मालिका खेळली जात आहे. त्यात टीम इंडिया २-१ ने आघाडीवर आहे. या दोन्ही संघांमधील चौथा टी २० सामना सुरू होणार आहे. या सामन्यापूर्वी ओल्ड ट्रॅफर्ड स्टेडियमवर टीम इंडियाचे भव्य स्वागत करण्यात आले. मँचेस्टरच्या कौन्सिल जनरल ऑफ इंडियाने भारतीय महिला क्रिकेट संघाला ओल्ड ट्रॅफर्ड स्टेडियममध्ये आमंत्रित केले. या कार्यक्रमात महिला क्रिकेटपटूंचा सन्मान करण्यात आला. मँचेस्टर येथील भारतीय परिषदेच्या जनरल विशाखा यदुवंशी म्हणाल्या, तुम्ही भारताचे प्रतिनिधित्व करता. केवळ खेळातच नाही, तर आत्म्यानेही तुम्ही भारताचे प्रतिनिधित्व करता. तुमचा प्रवास केवळ क्रिकेटपुरता मर्यादित नाही, तर ही एक धाडसाची कहाणी आहे. त्यानंतर एका लहान मुलीने भारतीय महिला संघाची उपकर्णधार स्मृती मानधना हिला लाल गुलाब दिला. तर भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरचेही भव्य स्वागत करण्यात आले. पाहा व्हिडीओ-लँकेशायर काउंटी क्रिकेट क्लबचे सीईओ डॅनियल गिडनी देखील कार्यक्रमाला उपस्थित होते. ते म्हणाले, ओल्ड ट्रॅफर्ड हे सचिन तेंडुलकरच्या पहिल्या शतकासाठी प्रसिद्ध आहे. इतकेच नाही तर पुरुष क्रिकेटमध्ये येथे अनेक विक्रम झाले आहेत. आता येथे नवा इतिहास रचण्याची वेळ आली आहे. टी २० मालिकेत टीम इंडिया आघाडीवरया मालिकेत टीम इंडिया २-१ ने आघाडीवर आहे. मालिकेतील पहिला टी २० सामना टीम इंडियाने ९७ धावांनी जिंकला.




### सूर्यवंशीनं मोडला विक्रम

**नवी दिल्ली :** १९ वर्षांखालील भारतीय संघानं इंग्लंड दौऱ्यावरील पाच सामन्यांची वनडे मालिका ३-२ अशी खिशात घातली. भारत-इंग्लंड यांच्यातील युवा संघात झालेल्या या मालिकेत १४ वर्षीय वैभव सूर्यंवशीनं आपली खास छाप सोडली. स्पर्धेत धमाका केल्यावर इंग्लंड दौऱ्यावर अंडर १९ संघातून त्याने सर्वाधिक धावा करत इंग्लंडच मैदान गाजवलं. यासह त्याने शुबमन गिलचा विक्रमही मोडीत काढला आहे. भारत-इंग्लंड यांच्यातील १९ वर्षांखालील युवा संघात रंगलेल्या ५ सामन्यांच्या द्विपक्षीय मालिकेत वैभव सूर्यंवशी ७१ च्या सरासरीसह १७४.०१ च्या स्ट्राइक रेटनं ३५५ धावा कुटल्या. या धावसंख्येसह अंडर १९ यूथ वनडे मालिकेत सर्वाधिक धावा करण्याचा शुबमन गिलचा विक्रम त्याने मोडीत काढला. २०१७ मध्ये गिलनं गाजवलं होतं मैदानइंग्लंड दौऱ्यातील धमाकेदार कामगिरीसह अंडर-१९ यूथ वनडे मालिकेत भारताकडून सर्वाधिक धावा करण्याचा रेकॉर्ड आता वैभव सूर्यंवशीच्या नावे झाला आहे. याआधी शुबमन गिल याबाबतीत नंबर वन होता. २०१७ मध्ये गिलनं इंग्लंड विरुद्धच्या मालिकेत ३५१ धावा कुटल्या होत्या. यूथ वनडे मालिकेत सर्वाधिक धावा करणारे भारतीय फलंदाजांमध्ये ३५५- वैभव सूर्यवंशी विरुद्ध इंग्लंड, ३५१- शुबमन गिल विरुद्ध इंग्लंड, २९१ - अंबाती रायडू विरुद्ध इंग्लंड, २७८- शुबमन गिल विरुद्ध इंग्लंड, २४४ - आदित्य श्रीकांत विरुद्ध इंग्लंड, भारतीय अंडर १९ संघाचे प्रतिनिधीत्व करताना इंग्लंड अंडर १९ संघाविरुद्ध वैभव सूर्यंवशीनं ५२ चेंडूत शतकी खेळीसह वर्ल्ड रेकॉर्डही प्रस्थापित केला होता.



### बिस्मिल्ला शिनवारी यांचे निधन

**लाहोर :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच बिस्मिल्ला जान शिनवारी यांचे वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी निधन झाले. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने मंगळवारी यासंबंधित माहिती दिली. त्यांच्या निधनाच्या बातमीनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट जगतात शोककळा पसरली आहे. अफगाणिस्तानचे असलेले शिनवारी काही दिवसांपूर्वी तब्येत बिघडल्याने पाकिस्तानमधील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली परंतु त्यानंतर त्यांचे निधन झाले. शिनवारी यांनी ४६ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये मैदानावर पंच म्हणून जबाबदारी पार पाडली होती. शिनवारी हे आयसीसी आंतरराष्ट्रीय पंच पॅनेलचे सदस्य होते आणि त्यांनी २५ एकदिवसीय आणि २१ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये पंच म्हणून काम केले होते. डिसेंबर २०१७ मध्ये शारजाह येथे अफगाणिस्तान आणि आयर्लंड यांच्यात खेळल्या गेलेल्या एकदिवसीय सामन्यातून त्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले.एकदिवसीय क्रिकेटमध्ये, त्यांनी या वर्षी १८ फेब्रुवारी रोजी ओमान विरुद्ध अमेरिका सामन्यात पंच म्हणून काम केले; तर टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये, पंच म्हणून त्यांचा शेवटचा सामना १८ मार्च रोजी शारजाह येथे खेळला गेलेला अफगाणिस्तान विरुद्ध आयर्लंड सामना होता.



### सबलेंका विम्बल्डनच्या उपांत्य फेरीत

**लंडन :** अव्वल मानांकित अरीना सबलेंका हिने विम्बल्डन ग्रँडस्लॅम या प्रतिष्ठेच्या टेनिस स्पर्धेतील महिला एकेरीची उपांत्य फेरी गाठली. सबलेंका हिने लॉरा सिगमंड हिचे आव्हान तीन सेटमध्ये परतवून लावत अंतिम चार फेरीमध्ये प्रवेश केला.अरीना सबलेंका व लॉरा सिगमंड यांच्यामध्ये उपांत्यपूर्व फेरीची लढत रंगली. पहिल्या सेटमध्ये सिगमंड हिने अव्वल दर्जाचा खेळ केला. तिने हा सेट ६-४ असा आपल्या नावावर करताना आघाडी मिळवली. पुढील दोन सेटमध्ये मात्र सबलेंका हिला सर्वोत्तम खेळ करावा लागला. सबलेंका हिने दुसरा सेट ६-२ असा जिंकला व बरोबरी साधली. अखेरच्या सेटमध्ये सबलेंकाने ६-४ अशी बाजी मारली. अखेर तिने दोन तास व ५४ मिनिटांमध्ये यश संपादन केले.दिमित्रोवच्या दुखापतीमुळे सिनरची आगेकूचपुरुष एकेरी विभागातील अव्वल मानांकित यानिक सिनर याच्यासमोर ग्रिगोर दिमित्रोव याचे आव्हान होते. दिमित्रोव पहिल्या दोन सेटमध्ये ६-३, ७-५ असा पुढेही होता. त्यानंतर तिसऱ्या सेटमध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये २-२ अशी बरोबरी झाली होती. मात्र दिमित्रोव याला दुखापतीचा सामना करावा लागला.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)